www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी




मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : ३९ शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

## महिला बचत गटांच्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री



**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर, केतन भोज**

बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच सहाय्यक आयुक्त, एन विभाग यांच्या वतीने महिला व बाल कल्याण योजना तसेच राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत बचत गटांमार्फत उत्पादित वस्तूंचे "प्रदर्शन व विक्री मेळावा" घाटकोपर पूर्व येथे आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा गुरुवार, दिनांक 16 ऑक्टोबर ते शुक्रवार, दिनांक 17 ऑक्टोबर 2025 या कालावधीत सकाळी 10.00 ते रात्री 8.00 वाजेपर्यंत खुला राहणार आहे. या उपक्रमाचे आयोजन निलयोग स्क्वेअर मॉलसमोर, घाटकोपर (पूर्व) येथे करण्यात आले आहे.


प्रदर्शनामध्ये बचत गटांनी तयार केलेल्या विविध आकर्षक वस्तूंचा समावेश आहे. त्यात कापडी पिशव्या, हॅण्डमेड ज्वेलरी, दिवे, पणत्या, कंदिल, मेणबत्त्या, मेकअप पाऊच, तोरण, कपडे, सोलापुरी चादरी, लेदर प्रॉडक्टस्, ग्रीटिंग कार्डस्, कोकण मेवा, दिवाळी फराळ, मुखवास, चॉकलेटस्, खाद्य पदार्थ, सॅनिटरी पॅड्स, आर्टिफिशियल फ्लॉवर्स अशा अनेक वस्तूंचा समावेश आहे.

या प्रदर्शनाचा उद्देश महिला बचत गटांना स्वावलंबनाकडे प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे असल्याचे समाज विकास अधिकारी साधना खाडे यांनी सांगितले. उपायुक्त संतोषकुमार धोंडे आणि सहायक आयुक्त गजानन बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या महिला बचत गट केंद्राचे उद्घाटन एन वार्डच्या तक्रार निवारण अधिकारी वैशाली निकुंभ यांच्या हस्ते करण्यात आले.

# सायबर सुरक्षेबाबत जागरूकता लक्झरी नव्हे तर गरज - माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,संतोष पाटील**

सायबर सुरक्षा आणि डिजिटल साक्षरतेबाबत जागरूक राहणे ही बाब आता केवळ लक्झरी नाही, तर काळाची गरज बनली आहे. शासन, प्रशासन आणि सर्वसामान्य नागरिकांनी याबाबत सतत अद्ययावत राहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले.




नॅशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटर आणि माहिती तंत्रज्ञान संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सुरक्षा जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला महाआयटीचे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर, अतिरिक्त पोलिस महासंचालक (सायबर) यशस्वी यादव, एनआयसी दिल्लीचे उप महासंचालक डॉ.राजेशकुमार पाठक, बीएआरसीचे वरिष्ठ वैज्ञानिक जीजी जोसेफ आणि एनआयसी महाराष्ट्राच्या सपना कपूर तसेच विविध राज्याचे एनआयसीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.शेलार म्हणाले की, आपल्या दैनंदिन जीवनात आणि प्रशासकीय कामकाजात डिजिटल क्रांतीमुळे आमूलाग्र बदल झाले आहेत. आज मंत्रालयात काम करणारा प्रत्येक अधिकारी डिजिटल प्लॅटफॉर्मवर कार्यरत आहे. त्यामुळे सायबर सुरक्षा आणि आपल्या जबाबदाऱ्या यांचा थेट संबंध निर्माण झाला आहे. अज्ञानामुळे केलेल्या चुकीसाठीही कायदा माफ करत नाही. त्यामुळे सायबर सुरक्षेबाबत अद्ययावत राहणे आवश्यक आहे.

डिजिटल व्यवहारांमध्ये भारत आज जगात अग्रस्थानी आहे. प्रत्येकजण डिजिटल पेमेंट स्वीकारत आहे. भारत आज सर्वाधिक आणि सर्वात सुरक्षित डिजिटल व्यवहार करणारा देश बनला आहे. पण या प्रगतीसोबतच सायबर गुन्ह्यांची जटिलता आणि प्रमाणही वाढले असल्याचे मंत्री ॲड.शेलार यांनी सांगितले.

सायबर हल्ल्यांपासून वाचण्यासाठी फक्त तांत्रिक कौशल्य नव्हे तर योग्य मानसिकता विकसित करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाने २०१६ पासून सायबर सुरक्षेसाठी सक्षम पायाभूत व्यवस्था उभारली आहे. राज्यात २४ तास कार्यरत 'कमांड अँड कंट्रोल सेंटर', 'सायबर हेल्पलाइन' आणि 'मोबाईल ॲप' उपलब्ध आहेत. तसेच 'टेक्नॉलॉजी असिस्टंट इन्व्हेस्टिगेशन युनिट' आणि 'एआय आधारित डिटेक्शन' प्रणालीही कार्यरत आहे. महाराष्ट्र हे 'कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम' स्थापन करणारे पहिले राज्य ठरले असल्याचेही मंत्री ॲड.शेलार यांनी अभिमानाने सांगितले.

यावेळी मंत्री ॲड.शेलार यांनी डीपफेक तंत्रज्ञानामुळे उद्भवणाऱ्या गंभीर धोक्यांकडेही लक्ष वेधले. डीपफेकमुळे केवळ व्यावसायिक नव्हे, तर वैयक्तिक आणि कौटुंबिक आयुष्यही उद्ध्वस्त होऊ शकते. त्यामुळे त्याच्या ओळख आणि प्रतिबंधासाठी प्रत्येकाने सतर्क राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

**सायबर सुरक्षेच्या युगात 'एक क्लिकवर पोलीस मदत' - अतिरिक्त पोलिस महासंचालक यशस्वी यादव**

डिजिटल युगात सर्व सेवा एका क्लिकवर उपलब्ध होत असताना पोलीस सेवा देखील तितक्याच सहजतेने उपलब्ध व्हावी यासाठी नागरिकांना सायबर मदतीसाठी हेल्पलाइन क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहे. या हेल्पलाइनवर सायबर क्षेत्रातील उत्कृष्ट तज्ज्ञ व अधिकारी अत्याधुनिक सॉफ्टवेअरच्या सहाय्याने तत्काळ मदत करतात, असे महाराष्ट्र सायबरचे अतिरिक्त पोलिस महासंचालक यशस्वी यादव यांनी सांगितले.

सायबर विभागाच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी आता १९३० आणि १९४५ हे दोन्ही क्रमांक कार्यान्वित आहेत. यातील हेल्पलाइन क्रमांक १९३० हा सायबर आर्थिक फसवणुकीसंदर्भात तक्रार नोंदवण्यासाठी आहेत तर हेल्पलाइन क्रमांक १९४५ हा आर्थिक फसवणूक व्यतिरिक्त इ एफ.आय.आर आणि कायदेशीर कार्यवाहीसाठी आहे.

या क्रमांकावर केलेले कॉल्स स्वीकारुन त्यावर प्रभावी तपास व कारवाईनंतर नागरिकांना समाधानकारक सेवा मिळत असल्याचेही अतिरिक्त पोलिस महासंचालक श्री.यादव यांनी सांगितले.

**राष्ट्रीय सुरक्षेला बळकटी देण्यासाठी ठोस उपाययोजना - उप महासंचालक डॉ.राजेश कुमार पाठक**

भारत सरकारने राष्ट्रीय सुरक्षेला बळकटी देण्यासाठी दूरसंचार नेटवर्क सुरक्षा, सायबर सुरक्षा आणि सायबर गुन्हेगारीसंदर्भात विविध विभागांसाठी ठोस जबाबदाऱ्या निश्चित केल्या आहेत. माहिती तंत्रज्ञान मंत्रालय आणि नॅशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटर यांनी प्रत्येक मंत्रालयात मुख्य माहिती सुरक्षा अधिकारी आणि उप मुख्य सुरक्षा अधिकारी नेमले आहेत. तसेच एनआयसी ने जीएसओपी तयार करण्याचे कार्य सुरू केले असून, दिल्लीतील शास्त्री पार्क येथे त्याचे केंद्र उभारले जात आहे, अशी माहिती एनआयसी दिल्लीचे उप महासंचालक डॉ.राजेश कुमार पाठक दिली.

या सायबर सुरक्षा मोहिमेद्वारे नागरिक आणि संस्था यांना मजबूत पासवर्ड वापरणे, मल्टी-फॅक्टर ऑथेंटिकेशन सक्षम करणे, सॉफ्टवेअर नियमित अद्ययावत ठेवणे, फिशिंग ईमेलपासून सावध राहणे, डेटा एन्क्रिप्ट करणे आणि बायोमेट्रिक सुरक्षा वापरण्याचे आवाहन करण्यात आले.

# मनसे पनवेल शहराच्या वतीने उद्या दोन मोर्चांचे आयोजन

## पाणी टंचाई आणि माथाडी कामगारांच्या मुद्द्यांवर आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल,वार्ताहर**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) पनवेल शहराच्या वतीने उद्या दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दोन महत्वपूर्ण आंदोलनांचे आयोजन करण्यात आले आहे. या आंदोलनांमध्ये सर्व पदाधिकारी आणि महाराष्ट्र सैनिकांना सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन मनसे शहराध्यक्ष योगेश जनार्दन चिले यांनी केले आहे. पाणी टंचाईच्या समस्येवर सर्वपक्षीय मोर्चा आणि माथाडी कामगारांच्या हितासाठी मनसे माथाडी सेनेच्या वतीने मोर्चा काढला जाणार आहे.पहिला मोर्चा सकाळी १० वाजता कळंबोली बसस्टॉप येथून निघणार असून, तो पाणी टंचाईच्या विरोधात सर्वपक्षीय स्वरूपाचा असेल. शहरातील




वाढत्या पाणी समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी हा मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. दुसरा मोर्चा दुपारी १२ वाजता कळंबोली ब्रिजखाली गुरूकृपा हॉटेल येथून निघेल. हा मोर्चा महाराष्ट्र नवनिर्माण माथाडी सेना आयोजित करीत असून, माथाडी कामगारांच्या विविध मागण्यांसाठी तो काढला जाणार आहे. या मोर्चासाठी श्री. सचिन गोळे हजर राहणार असून, मनसे नेते मा. अमित ठाकरे यांचे विशेष लक्ष असल्याची माहिती देण्यात आली आहे.मनसे प्रवक्ता तथा शहराध्यक्ष योगेश जनार्दन चिले यांनी सांगितले की, "शहरातील जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी मनसे नेहमी आघाडीवर राहिली आहे. पाणी टंचाई आणि माथाडी कामगारांच्या हक्कांसाठी हे आंदोलन निर्णायक ठरणार आहे. सर्व पदाधिकारी आणि सैनिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे." या आंदोलनांमुळे पनवेल शहरातील वाहतूक आणि जनजीवनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. स्थानिक प्रशासनाने याबाबत आवश्यक तयारी करण्याचे संकेत दिले आहेत. मनसे कार्यकर्ते उत्साहात असून, हे मोर्चे शांततेत पार पाडले जातील, असे चिले यांनी स्पष्ट केले.

# राष्ट्रवादी पक्षाने आदेश दिले तर अजित पवार गटाचे शामराव हुले पारगाव जिल्हा परिषद रणांगणात उतरणार

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेसचा ढाण्यावाघ म्हणून ओळखले जाणारे शामराव हुले पारगाव जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. पक्षाने आदेश दिल्यास, जनतेच्या सेवेसाठी व विकासासाठी रणांगणात उतरण्याची तयारी त्यांनी दाखवली आहे. शामराव हुले हे फक्त राजकारणी नसून, लोकांच्या सुख दुःखात नेहमी धावून जाणारे, गावोगावी परिचित असलेले समाजसेवक आहेत. पूरस्थिती असो वा दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांची अडचण असो वा विद्यार्थ्यांचा प्रश्न प्रत्येक वेळी त्यांनी तत्परतेने मदतीचा हात दिला आहे. त्या मुळे पारगाव परिसरातील नागरिकांच्या मनात त्यांच्या नावाचा एक वेगळा ठसा उमटलेला आहे. गेल्या काही वर्षांत त्यांनी "राजकारण हे सेवेसाठी असतं, सत्तेसाठी नव्हे" हा विचार अंगीकारून जनतेत काम केलं आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि शेतकरी वर्गीय समस्यांवर सातत्याने आवाज उठवणाऱ्या हुले यांचा जनाधार दिवसेंदिवस वाढत आहे. आता जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये आणि स्थानिक जनतेत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. पक्षाने आदेश दिल्यास, पारगाव गटात शामराव हुले मैदानात उतरतील आणि विकासाच्या नव्या युगाची सुरुवात करतील, असा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त केला जात आहे."जनतेचा विश्वास, सेवाभावाची ओळख आणि विकासाचं ध्येय या तिन्हींचा संगम म्हणजे शामराव हुले", असा जनतेतून उमटणारा स्वर आहे.






# रायगड जिल्ह्यात जय भारतीय जनरल कामगार संघटनेचा विजय

## शेल इंडियाच्या कामगारांना तब्बल १ लाख २० हजार रुपये बोनस

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

देशातील सर्वात मोठा आणि आनंदाचा सण असलेल्या दिपावलीनिमित्त कामगारांना त्यांच्या आस्थापनांकडून बोनस दिला जातो. यंदा रायगड जिल्ह्यातील विविध औद्योगिक क्षेत्रांमध्ये बोनस वाटपाच्या चर्चांना वेग आला असताना, आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कामगारनेते जितेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या जय भारतीय जनरल कामगार संघटनेने कामगारांच्या हिताचे भक्कम प्रतिनिधित्व करून तळोजा औद्योगिक क्षेत्रातील शेल इंडिया मार्केट्स प्रायव्हेट लिमिटेड मधील कामगारांना यंदा तब्बल १ लाख २० हजार रुपयांचा सर्वाधिक बोनस मिळवण्यात यश संपादन केले आहे.



त्याचप्रमाणे पुढील वर्षी १ लाख २५ हजार रुपये आणि त्या पुढील वर्षी १ लाख ३० हजार रुपये कामगारांना बोनस देण्यात येणार आहे. त्या संदर्भातील करार कंपनी आणि कामगार संघटनेत झाला. या करारावर व्यवस्थापनाच्यावतीने अधिकारी शशांक शेखर व गुलशन चौधरी यांनी तर संघटनेच्या वतीने अध्यक्ष जितेंद्र घरत यांनी तसेच कामगार प्रतिनिधींनी स्वाक्षऱ्या केल्या. या कंपनीतील बहुतांश कामगारांनी संघटनेचे नेतृत्व स्वीकारल्यानंतर त्यावेळी कामगारांना भरघोस पगारवाढ व सुविधा यापूर्वीच देण्यात आल्या. संघटनेच्या या यशामुळे कामगारांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, दिवाळीचा आनंद द्विगुणीत झाला आहे. आज संघटनेचे सल्लागार लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांची संघटनेचे पदाधिकारी व कामगार प्रतिनिधींनी सदिच्छा भेट त्यांना दीपावलीच्या शुभेच्छा देत त्यांचे आभार मानले. यावेळी रामदास गोंधळी, सुनील पाटील, यासिम शेख, अनिल पावशे, जयराम जाधव, सुनील हरिश्चंद्रकर आदी उपस्थित होते. संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत यांनी याबद्दल बोलताना सांगितले कि, म्हणाले की, "कामगारांचे हक्क मिळवण्यासाठी संघटना सदैव तत्पर असते. या वर्षीही अनेक चर्चांनंतर कामगारांना योग्य तो बोनस मिळवून देण्यात आम्ही यशस्वी ठरलो आहोत. कामगार आणि कंपनी यांचे नाते घट्ट असले पाहिजे, कारण त्यामुळे कंपनी आणि कामगार यांचे भले होते. जय भारतीय जनरल कामगार संघटना कामगारांच्या हक्कासाठी लढत असते. त्यामुळे ती जबाबदारी घेऊन संघटना काम करत असते, असेही जितेंद्र घरत यांनी नमूद केले.

# एसटी प्रवासादरम्यान सोन्याच्या दागिन्यांची डबी केली लंपास

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

एसटी प्रवासादरम्यान एका महिलेकडे असलेल्या हॅन्डबॅग मधून सोन्याच्या दागिन्यांची डबी लंपास केल्याची घटना पनवेल एसटी स्टॅन्ड परिसरात घडली आहे.

सविता पाटील (वय ६६ रा. पोयनाड) या पनवेल एसटी स्टॅन्ड येथून शिवशाही बस मध्ये बसल्या असताना त्यांना त्यांच्याकडे असलेल्या हॅन्डबॅगची चैन उघडी दिसली. त्यावेळी त्यांनी अधिक तपासणी केली असता त्यांच्याकडे असलेल्या सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याच्या ४ बांगड्या व सोन्याचा हार असा मिळून ११ लाख २० हजार रुपये किमतीचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे त्यांच्या लक्षात आल्याने याबातची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# सराईत चैन स्नॅचिंग करणाऱ्या गुन्हेगाराकडून चोरीच्या २ मोटारसायकलीसह ४ गुन्हे उघडकीस

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

पनवेल शहरासह करंजाडे व परिसरात चैन स्नॅचिंग सह मोटार सायकली चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेणे असून त्यांच्याकडून आता पर्यंत चोरीच्या २ मोटार सायकली सह चैन स्नॅचिंगचे ४ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

गेल्या काही दिवसापासून चैन स्नॅचिंग व मोटार सायकलींच्या चोरी संदभार्त काही गुन्हे पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले होते. या संदर्भात वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदशनाखाली गुन्हे शाखेचे पोनी शाकीर पटेल, पोलीस उपनिरीक्षक विनोद लबडे, हजरत पठाण, पोलीस हवालदार अविनाश गंथडे, परेश म्हात्रे, योगेश दिवेकर, महेंद्र वायकर, पोलीस नाईक सम्राट डाकी, मिथुन भोसले,, प्रवीण मेथे, शशिकांत काकडे, पोलीस शिपाई चंद्रशेखर चौधरी, नितीन कांबळे, महिला पोलीस शिपाई साधना पवार आदींच्या पथकाने गुप्त बातमीदार आणि तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी सलमान साजिद जाफरी उर्फ शेरू वय २२ रा. आंबीवली याला ताब्यात घेऊन अधिक चौकशीमध्ये त्याने चोरलेल्या २ मोटार सायकली ज्याची किंमत जवळपास १ लाख १५ हजार इतकी आहे व सोन्याचे दागिने ज्याची किंमत जवळपास ९५ हजार इतकी आहे असा एकूण २ लाख १० हजार रुपये किमतीचा ऐवज हस्तगत करण्यात आला असून पुढील तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

# तरुण बेपत्ता

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक तरुण कोठे तरी निघून गेल्याने तो हरवल्याची तक्रार उलवा पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे.

लोकेश अशोक हिवाळे (वय २४ रा.उलवे) रंग सावळा. अंगाने माध्यम, उंची ५ फूट २ इंच, केस काळे, डोळे काळे, अंगात काळया रंगाचा वाट्यावर चेक्सचा शर्ट व जीन्स पॅन्ट घातलेली आहे. मिशी वाढलेली आहे. त्याला मराठी आणि हिंदी भाषा अवगत आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उलवा पोलीस ठाणे मो नं- ८६५५३५४१२१ / ७५०६०१२८९८ किंवा सहा पोलीस उपनिरीक्षक गणेश पाटील यांच्याशी संपर्क साधावा

# उरण वाहतूक शाखेकडून यु इ एस स्कूल मध्ये सुरक्षिततेसंदर्भात मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

उरण वाहतूक शाखेकडून यु इ एस स्कूल उरण येथे शालेय परिवहन समितीच्या बैठकीस भेट देण्यात आली. सदर बैठकीस मुख्याध्यापक, पालक प्रतिनिधी, बस चालक व ऑपरेटर प्रतिनिधी, परिवहन प्रभारी शिक्षक तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्य उपस्थित होते.

बैठकीदरम्यान उरण वाहतूक शाखेकडून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात आवश्यक त्या सूचना व मार्गदर्शन पो.उप.नि. उद्धव सोळंके यांनी केले. यावेळी शालेय बसची तांत्रिक तपासणी, चालकांची पात्रता व बसवरील सुरक्षा साधनांची (CCTV, GPS, फर्स्ट एड बॉक्स इत्यादी) उपलब्धता तपासण्याबाबत विशेष निर्देश देण्यात आले. तसेच उपस्थित केलेल्या शंकांचे निराकरन करण्यात आले.

# मोबाईलच्या युगात वाचन संस्कृती जपण्याचे आवाहन - अशोक शेळके

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**



**पालखेड** – आजच्या डिजिटल युगात मोबाईलमुळे तरुणाईचे वाचन कमी झाले असून वाचन संस्कृती टिकवणे, रुजवणे आणि संवर्धित करणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थीदशेपासूनच वाचनाची सवय लागल्यास मनुष्य परिपूर्ण घडतो, असे प्रतिपादन महाराष्ट्र शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, पालखेडचे मुख्याध्यापक अशोक शेळके यांनी केले. ते भारताचे माजी राष्ट्रपती, मिसाइलमॅन व भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या ९४ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी "वाचाल तर टिकाल", "पुस्तकांशी करा मैत्री – ज्ञानाची मिळते खाणी", "वाचन हे मेंदूचे अन्न", "ग्रंथ हीच खरी संपत्ती" अशा घोषवाक्यांद्वारे वाचन संस्कृतीबाबत जनजागृती केली.

वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी सलग एक तास विविध प्रकारची पुस्तके वाचली. यात अकबर-बिरबल कथा, तेनालीरामाच्या गोष्टी, महाभारत-रामायणातील प्रसंग, थोर शास्त्रज्ञ, क्रांतिकारक, शूर वीरांगना, शिवरायांच्या कथा, अग्निपंख, संस्कार कथा, विनोदी गोष्टी आणि चुटकुले यांचा समावेश होता.

कार्यक्रमास मुख्याध्यापक अशोक शेळके यांच्यासह निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्धवळे, संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे, राहुल दवते, वैशाली मोते, सागर जाधव, राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव, संजय कोकतरे, कविता ढोमसे, सारिका पवळे, सुरेश गांगुर्डे, रामदास पवार, नदीम तांबोळी आदी उपस्थित होते.या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन वाचन संस्कृतीचा प्रसार व्हावा, हा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

# खारघर, तळोजा परिसरातील जलपुरवठा होणार सुरळीत

## भाजप पदाधिकाऱ्यांच्या पाठपुराव्याला यश



**दैनिक युवक आधार**
**खारघर(प्रतिनिधी)**

खारघर आणि तळोजा परिसरातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे. या भागातील नागरिकांना दिलासा देणारा निर्णय सिडकोकडून घेण्यात आला असून, येत्या काही दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत होणार असल्याची अधिकृत माहिती लेखी स्वरूपात देण्यात आली आहे.

बेलापूर येथील सिडको भवनामध्ये बुधवारी या संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, निर्दोष केणी, विनोद घरत, साजिद पटेल, आशा बोरसे, जगदीश घरत, सचिन वास्कर आणि संतोष पाटील यांनी नागरिकांच्या वतीने पाणी प्रश्नावर सिडको अधिकाऱ्यांशी चर्चा केली. या बैठकीला सिडकोचे अधीक्षक अभियंता पी.एम शेवतकर उपस्थित होते. बैठकीदरम्यान तळोजा फेज 1 व 2 तसेच खारघर सेक्टर 23, 27, 30, 34, 35, 36, 39 आणि 40 या भागातील पाणीपुरवठा सुधारण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला. सिडकोने दिलेल्या लेखी पत्रानुसार, नवी मुंबई महानगरपालिकेकडून अतिरिक्त एमएलडी पाणीपुरवठा करण्यासाठी विनंती करण्यात आली आहे.

हेटवणे धरणातून मिळणाऱ्या पाण्याचा पुरवठा वाढविण्यासाठी मागणी नोंदविण्यात आली आहे. खारघर सेक्टर 26 मधील पंप हाउस येथे नवीन पंप बसविण्याचे काम प्रगतीपथावर असून ते पूर्ण झाल्यानंतर पुरवठा अधिक सुरळीत होईल, या निर्णयामुळे खारघर व तळोजा परिसरातील हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. भाजप पदाधिकाऱ्यांनी नागरिकांच्या समस्या सातत्याने पुढे मांडत प्रशासनाचे लक्ष वेधले होते. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, सिडकोने दिलेल्या लेखी पत्रानंतर स्थानिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी यांनी सांगितले की, नागरिकांच्या हितासाठी आम्ही गेल्या अनेक दिवसांपासून सिडकोकडे मागणी करत होतो. अखेर सिडकोने सकारात्मक प्रतिसाद देऊन पाणीपुरवठा सुरळीत करण्याची हमी दिली आहे. या निर्णयाबद्दल खारघर व तळोजा रहिवाशांनी भाजप पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

# लाखनी येथे ग्रामीण युवा साहित्य संमेलनाचे आयोजन

## संमेलनाध्यक्षपदी प्रा. डॉ. संजयकुमार निंबेकर

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा** - दिनांक 15 आणि 16 नोव्हेंबर 2025 रोजी लाखनी येथील उत्सव सेलिब्रेशन लान अँड हाल या सभागृहात दोन दिवसीय जिल्हास्तरीय पहिल्या ग्रामीण युवा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध रंगकर्मी आणि समीक्षक प्रा. डॉ.संजयकुमार निंबेकर यांची निवड करण्यात आली आहे. दोन दिवस चाललेल्या या साहित्य संमेलनात दोन परिसंवाद, एक चर्चासत्र,एक कविसंमेलन, अरुण बनसोड यांची खडीगंमत, डॉ.हरिश्चंद्र बोरकर यांची प्रकट मुलाखत, अनिल शेंडे आणि पालिकचंद बिसेन यांचे बासरी वादन, महेंद्र गोंडाने यांचा विनोदी एकपात्री प्रयोग -' सहावी बाळंतीण ', झाडीपट्टीतील युवा कलावंतांचा पंचरंगी लोककलाविष्कार - 'झाडीपट्टीचा धुमधडाका ' असे भरगच्च कार्यक्रम होणार असून उद्घाटन, परिसंवाद, कविसंमेलन आणि समारोपात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिक आणि विचारवंत उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात काही मान्यवरांच्या पुस्तकांचे प्रकाशनही होणार आहे .मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ महाराष्ट्र शासन आणि मुक्ताई बहुउद्देशीय शिक्षण संस्था दिघोरी( नान्होरी) जि. भंडारा यांच्या विद्यमाने आयोजित या साहित्य संमेलनात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे सचिव आणि मुख्य संयोजक प्रा.डॉ.सुरेश खोब्रागडे,निमंत्रक प्रा. डॉ.युवराज खोब्रागडे स्वागताध्यक्ष संजय वनवे, आयोजन समिती अध्यक्ष रामेश्वर बिसेन, पदाधिकारी डॉ. रेवाराम खोब्रागडे, सुरेंद्र बन्सोड, सुमनताई कानेकर,मंगलमूर्ती किरणापुरे, आशाताई वनवे,प्रा. उमेश सिंगनजुडे, विष्णू चाचेरे, पंकज खांडेकर, आणि आयोजन समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# 'वसुंधरा-प्लास्टिकमुक्त दिवाळी' जरंडी ग्रामपंचायतीच्या उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:-** तालुक्यातील जरंडी ग्रामपंचायतीतर्फे पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यासाठी 'वसुंधरा अंतर्गत प्लास्टिकमुक्त दिवाळी' उपक्रम जरंडी गावात राबविण्यात येत आहे. दिवाळी सणाच्या तोंडावर होणारे ध्वनी, वायुप्रदूषण यासह प्लास्टिकचा अतिवापर टाळण्यासाठी प्रशासनाने नागरिकांना जागरूक करण्याचे विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. दिवाळीत स्थानिक उत्पादनांचा वापर करावा, एकेरी प्लास्टिक टाळावे, टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार कराव्यात,स्वच्छता मोहिमेत सहभागी व्हावे असे आवाहन सरपंच स्वाती पाटील यांनी केले आहे.दिवाळीत तयार होणारा ओला कचरा हिरव्या व सुका कचरा पेटीतसंकलित करावा, ध्वनी, वायुप्रदूषणविरहित दिवाळी साजरी करण्याची शपथ घ्यावी, असे आवाहन ग्रामपंचायततर्फे करण्यात आले आहे.

> **फटाके वाजविल्यामुळे हवा व ध्वनिप्रदूषणात वाढ होत असल्यामुळे याचे गंभीर परिणाम होतात म्हणून येणाऱ्या सण, उत्सवात फटाके वाजविण्यास बंदी आहे. पर्यावरणपूरक दिवाळी म्हणून साजरी करूयात.**
> **सुनील मंगरुळे, ग्रामपंचायत अधिकारी**

जरंडी ग्रामपंचायतीकडून आवाहन करण्यात येते की,सर्व नागरिकांनी पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करून पर्यावरणाचे रक्षण करावे.

# पर्यावरण व आरोग्याच्या समतोलासाठी सायकलिंग सर्वोत्तम" — डॉ. महेंद्र महाजन

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**




**निफाड** :सायकलिंग करणे हे केवळ शारीरिक व्यायामासाठीच नव्हे, तर पर्यावरणीय समतोल राखण्यासाठीही अत्यंत उपयुक्त आहे. नियमित सायकलिंग केल्याने मानसिक व शारीरिक आरोग्य सुदृढ राहते, असे प्रतिपादन प्रसिद्ध सायकलिस्ट डॉ. महेंद्र महाजन यांनी निफाड येथे केले.

निफाड सायकलिस्टतर्फे आयोजित 'सायकलिस्ट गुणगौरव सोहळ्या'त ते बोलत होते. या कार्यक्रमात विविध लांब पल्ल्याच्या सायकल राईड पूर्ण करणाऱ्या महिला व पुरुष सायकलिस्टांचा सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र राज्य सायकलिस्ट असोसिएशनचे उपाध्यक्ष राजेंद्र वानखेडे अध्यक्षस्थानी होते.

या वेळी नाशिक जिल्हा सायकलिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष अमित घुगे, उपाध्यक्ष प्रविण कोकाटे, संचालक नितीन कोटकर, श्रीपाद गायधनी, अश्विनी कोंडेकर, शांतीलाल सोनी पतसंस्थेचे चेअरमन अशोक पोफळिया, तसेच पक्षीमित्र डॉ. उत्तमराव डेर्ले आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात पंढरपूर, सातारा, पाटणादेवी, नस्तनपूर, ईच्छापूर्ती गणपती व वणी सायकल राईड पूर्ण करणाऱ्या सायकलिस्टचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी निफाड सायकलिस्टची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी पांडुरंग कडवे, उपाध्यक्षपदी संदीप गवळी, सचिवपदी दीपक बोरसे, तर सदस्यपदी राजु गवळे, दीपक घंगाळे, पूजा मगर, मनीषा वाघ, आरती मोगल यांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमात नितीन कोटकर, अश्विनी कोंडेकर, अमित घुगे व डॉ. उत्तमराव डेर्ले यांनी मनोगते व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात राजेंद्र वानखेडे यांनी सायकलिंगची चळवळ वाढविण्यासाठी 'सायकल ऑन संडे'सारखे उपक्रम राबविण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. रामनाथ शिंदे यांनी केले, तर आभार प्रविण तनपुरे यांनी मानले. या सोहळ्यास डॉ. सीमा डेर्ले, प्रविण तनपुरे, अशोक कोल्हे, अथर्व नकाते तसेच निफाड तालुक्यातील महिला व युवक सायकलिस्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रसोली बीचवर धक्कादायक प्रकार; भावानेच बहिणीच्या प्रियकरावर हॉकी स्टीकने हल्ला

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे अलिबाग**




प्रेमसंबंधावरून संताप ,तरुण गंभीर जखमी परिसरात खळबळ, प्रेमसंबंधाच्या वैयक्तिक रागातून अलिबाग तालुक्यातील प्रसिद्ध वरसोली समुद्र किनाऱ्यावर भावानेच बहिणीच्या प्रियकरावर हॉकी स्टीकने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ माजली असून, नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लावण्य उदेश गावंड (वय 21, रा. साई मंदिर, मांडवा, ता. अलिबाग) हा आपल्या मैत्रिणीसोबत वरसोली बीचवर भेटण्यासाठी आला होता. दोघे गाडीत बसून संवाद साधत असतानाच अचानक त्या तरुणीचा भाऊ आदित्य पाटील घटनास्थळी पोहोचला. बहिणीला बॉयफ्रेंडसोबत पाहताच त्याचा राग अनावर झाला आणि संतापाच्या भरात त्याने हॉकी स्टीकने लावण्यवर उजव्या डाव्या हातावर आणि पायावर वार केले. यात लावण्य गंभीर जखमी झाला असून, त्याला तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी अलिबाग पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक 189/2025 भादंवि कलम 118 (1), 211 (2) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक किशोर साळे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार प्रशांत ठाकूर करत आहेत. स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हा हल्ला पूर्णपणे वैयक्तिक रागातून घडलेला असून पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू आहे." समाजाला विचार करायला लावणारा प्रश्न" प्रेमसंबंधांमध्ये मतभेद असू शकतात, पण हिंसा हा कधीच उपाय ठरत नाही. राग आणि अहंकार यांच्या भरात घेतलेले निर्णय आयुष्य उद्ध्वस्त करतात. भावनांवर नियंत्रण ठेवून संवाद साधणे आणि परस्पर समजूत काढणे हाच समाजातील शांततेचा मार्ग आहे. पालकांनी आणि तरुणांनी या घटनेतून शिकण्याची गरज आहे.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# वलप मधे रंगणार दिवाळी पहाट

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील वलप गावामधे गतवर्षी प्रमाणे यावर्षी ही लक्ष्मी पूजनच्या शुभ मुहूर्तावर मंगळवार दिनांक २१ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ६:३० वा. गुरूवर्य शंकुनाथ बुवा पडघेकर, विष्णुबुवा वावंजेकर, पद्माकर बुवा खारघर, मधुकरबुवा धोंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ व मित्र मंडळ वलप यांच्या विद्यमाने दिवाळी पहाटचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी गायक- अमित पाटील खारघर, महेश पाटील पेनधर, राजाबुवा भोईर पडघे यांच्या मधुर आवाजात पखवाज साथ करतील कुमार केणी पेठाली व तबला- अँड. सुरज गोंधळी यांनी खेरणे ह्या संगीत मैफिलीचा सर्व नागरिकांनी आनंद घ्यावा असे आवाहन ग्रामस्थ मंडळ वलपच्या वतीने करण्यात आले आहे.

# भटक्या कुत्र्यांचा चिमुकल्यांना चावा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

दोन चिमुकल्याना भटक्या कुत्र्याने चावा घेतल्याची घटना 15 ऑक्टोबर रोजी कामोठेत घडली. या भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

कामोठे सेक्टर 11 येथून इयत्ता पहिलीत शिकणारा सात वर्षीय मुलगा आणि सहा वर्षीय मुलीवर भटक्या कुत्र्याने अचानक हल्ला केला आणि त्यांचा चावा घेतला. कुत्र्याच्या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले. तळोजा परिसरात चार दिवसांपूर्वी अशाच प्रकारे भटक्या श्वानांनी काही जणांना चावा घेतला होता. त्यानंतर 15 ऑक्टोबर रोजी कामोठे परिसरात ही घटना घडली. पनवेल महापालिका हद्द आणि पनवेल तालुक्यात भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे मानवी जीविताला धोका निर्माण होत आहे. या भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# चिमुरडीचा विनयभंग

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका इमारतीत काम करणाऱ्या ६९ वर्षीय सुरक्षारक्षकाने याच इमारतीत राहणाऱ्या ८ वर्षीय मुलीसोबत अश्लील व लैंगिक चाळे केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

भारत बुचुन गौड असे या सुरक्षारक्षकाचे नाव असून त्याने पीडित मुलीसोबत अनेकवेळा अश्लील व लैंगिक चाळे केल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणाची माहिती पीडित मुलीच्या घरच्यांना समजल्यानंतर त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी याप्रकरणी भारत गौडविरोधात गुन्हा नोंद करून अटक केली आहे.

# जि. प. शाळा सोनवाडी येथे विद्यार्थ्यांना दिवाळी अभ्यास संच व गणवेश वाटप



**दैनिक युवक आधार**
**किनवट प्रतिनिधी दिलीप भालेराव**

**सोनवाडी :** जिल्हा परिषद शाळा सोनवाडी येथे विद्यार्थ्यांना दिवाळी सुट्टीतील अभ्यास संच व नविन शालेय गणवेश वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साहाचे हास्य फुलले .

या कार्यक्रमात मुख्याध्यापक श्री. सुदेवाड सर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. इढोळे सर, श्री बोंबले सर, श्री. आगरकर सर आणि श्री. बोतापल्ले सर यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिवाळीचा सण आनंदाने, सुरक्षिततेने आणि अभ्यासाची जोड राखत साजरा करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रम यशस्वी पार पडण्यासाठी सर्व शिक्षकवर्ग, विद्यार्थी व पालकांनी सहकार्य केले. शाळेच्या परिसरात आनंदमय वातावरण अनुभवायला मिळाले .

# जय भवानी महाविद्यालयात "ग्रंथप्रेम जागवणारा वाचन प्रेरणा" दिन उत्साहात साजरा

## वाचन प्रेरणा दिना निमित्त विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी म्हणून वाचनीय पुस्तकांचे वाटप

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा(प्रतिनिधी) :**

पाटोदा येथील जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या ग्रंथालय विभागाच्यावतीने दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोजी भारताचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम यांची जयंती 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंती निमित्ताने महाविद्यालयात सलग 'सात तास वाचन' हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला. या वेळी भारतरत्न डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे व प्रमुख पाहुणे म्हणून श्री. शिवाजीराव पंडित महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर व्यासपीठावर



प्रा.सोमनाथ घाडगे, कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे, प्रा.गोपाळ धांडे, व अंतर्गत मुल्यमापन समितीचे प्रमुख प्रा विनोद किर्दक यांची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी प्रास्ताविका मध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवन कार्या विषयी माहिती सांगितली. ते म्हणाले की, स्वप्न ते नव्हे जे झोपल्या नंतर पडते तर खरे स्वप्न ते असते जे तुम्हाला पूर्ण केल्या शिवाय झोपूच देत नाही. म्हणून प्रत्येकाने आपल्या ध्येयापर्यंत पोहचण्यासाठी वाचन केले पाहिजे. त्या साठी ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा.ज्योती रकटे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी म्हणून प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.विश्वास कदम आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वाचनीय पुस्तकांचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय लागावी या हेतूने सलग 'सात तास वाचन' हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला. प्रा.सोमनाथ घाडगे यांनी सांगितले की ग्रंथ हे माणसाच्या जीवनात बदल घडविणारे, अवगुणांचे सगुणात रूपांतर करणारे, विनाशापासून वाचविणारे असे ते ग्रंथ म्हणून तरुण पिढीने ग्रंथ वाचली पाहिजेत. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. विश्वास कदम म्हणाले की, 'तुम्हाला तुमचे व्यक्तिमत्त्व घडवायचे असेल तर वाचन करा' असा संदेश दिला. धावत्या युगाच्या बरोबरीने धावायचे असेल तर वाचन करा, असा संदेश त्यांनी दिला. डॉ.कलाम यांनी लिहिलेल्या अनेक पुस्तकांमधून येणाऱ्या काळात भारत कसा महासत्ता म्हणून पुढे येणार आहे, भारताची खरी शक्ती ही युवाशक्ती आहे हे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.डॉ.बंडू लोखंडे यांनी केले तर या कार्यक्रमाचे आभार महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्रा.ज्योती रकटे यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# शेकापच्या राजेंद्र पाटीलवर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमनुसार गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

प्रकल्पग्रस्तांचे लोकनेते दि. बा. पाटील यांचे चिरंजीव अतुल दि. बा. पाटील यांच्यावर खालच्या पातळीत टीका करणाऱ्या तसेच नामदेव गायकवाड गुरुजी यांना जातीवाचक शब्दांनी अपमानित केल्याबद्दल शेकापच्या राजेंद्र पाटीलवर अखेर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियमनुसार उलवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

शेतकरी कामगार पक्षाचे आणि मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक राजेंद्र पाटील नेहमीच वादग्रस्त वक्तव्यामुळे बदनाम आहेत. धमकावणे, मारहाण, खंडणी अशा गुन्हेगारी स्वरूपाचे अनेक गुन्हे त्यांच्यावर दाखल आहेत. विमानतळाचे उदघाटन झाल्यानंतर राजेंद्र पाटील यांनी लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल दि.बा. पाटील यांच्यावर खालच्या स्तरावर टीका केली होती. त्यामुळे राजेंद्र पाटील यांच्यावर भूमिपुत्रांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली. याच विमानतळाच्या अनुषंगाने बौद्ध समाजाचे नामदेव गायकवाड गुरुजी यांनी विमानतळबाधित पुनर्वसन या विषयावर वृत्तवाहिनीला मुलाखत दिली होती. मात्र राजेंद्र पाटील यांनी मुलाखतीचा संदर्भ देत गायकवाड गुरुजींविषयी अपमानास्पद वक्तव्य केले आहे. या प्रकरणी अॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली होती. त्या अनुषंगाने राजेंद्र पाटील यांच्यावर उलवा पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ कलम ३(१) (आर ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोकनेते दि. बा. पाटील यांनी आपले संपूर्ण आयुष्य भूमिपुत्रांसाठी वेचले. याची थोडीशीही जाणिव न ठेवता राजेंद्र पाटील यांनी दिबांचे चिरंजीव अतुल दि.बा. पाटील यांचा अपमान करत दिबासाहेबांचा आणि त्यांच्या कुटुंबीयांचा घोर अपमान केला. त्यामुळे दिबासाहेबांच्या अनुयायींमध्ये राजेंद्र पाटील यांच्या विरोधात संताप उसळला आणि भूमिपुत्रांनी राजेंद्र पाटील यांचा जाहीर निषेधही करत आम्ही दिबासाहेबांच्या कुटुंबासोबत आहोत अशी शाश्वती अधोरेखित केली. त्याचबरोबरीने सेवानिवृत्त मुख्याध्यापक गायकवाड गुरुजी यांचाही राजेंद्र पाटील यांनी अपमान केला. उलवे मध्ये राहणारे नामदेव रामचंद्र गायकवाड (वय -८३ वर्षे) हे बौद्ध समाजाचे प्रतिष्ठित व्यक्ती आहेत. ते सेवानिवृत्त मुख्याध्यापक असून पेन्शनमधून उदरनिर्वाह चालवतात. शिक्षण क्षेत्रातून सेवानिवृत्त झाल्यानंतर शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता म्हणून त्यांनी काम केले आहे. नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ उद्घाटनाचे कार्यक्रमानिमीत्त भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नवी मुंबई येथे येणार असल्याने लोकमत वृत्तवाहिनीचे पत्रकारांनी त्यांची मुलाखत घेतली होती. त्यावेळी त्यांनी उलवेचा झालेल्या विकासाबद्दल भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कामाचे कौतूक केले होते. त्यामध्ये उलवे हा आमचा खेडेगाव होता, या भागामध्ये शहरीकरण झाल्यामूळे आमच्या गावामध्ये सुधारणा होवून आम्हाला चांगले दिवस आले व आम्हाला पक्की घरे मिळाली. तसेच विमानतळामूळे आमच्या भागातील जमिनींना चांगला भाव मिळाला असे रोखठोक मत मांडले होते.मात्र राजेंद्र महादेव पाटील यांनी रेतिबंदर परिसरात सार्वजनिक ठिकाणी महाराष्ट्राचा आरसा न्यूज या वृत्तवाहिनीवर मुलाखत देताना मुलाखतीस अनुसरुन व राजेंद्र पाटील यांना गायकवाड गुरुजी अनुसुचित जातीचे असल्याचे माहिती असताना जातीचा पानउतारा करण्याच्या उद्देशाने सर्व लोकांना दिसेल अशा प्रकारे सार्वजनिक ठिकाणी उद्देशून 'लाचार होवून अर्धा किलो मटनासाठी गेलेल्या गायकवाड गुरुजींचा धिक्कार करतो' असे अपशब्द वापरुन जाहिरपणे वृत्तवाहिनीवर वक्तव्य करुन हेतूपुरस्सर अपमान केला आहे. वादग्रस्त वक्तव्य, सवंग प्रसिद्धीसाठी दादागिरी व दुसऱ्याचा अपमान करण्याचा ठेका घेणाऱ्या राजेंद्र पाटीलवर गायकवाड गुरुजींनी अखेर उलवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार राजेंद्र पाटील यांच्यावर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ कलम ३(१) (आर ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याबद्दल भूमिपुत्रांनी समाधान व्यक्त केले आहे तर लवकरात लवकर पोलीस प्रश्नासनाने कारवाई करावी, अशी अपेक्षा गायकवाड गुरुजींनी व्यक्त केली आहे.

> **लोकनेते दि. बा. पाटील यांनी आपले संपूर्ण आयुष्य भूमिपुत्रांच्या हक्कासाठी वेचलं. त्यांच्या कुटुंबाचा आणि समाजातील ज्येष्ठांचा अपमान हा संपूर्ण भूमिपुत्र समाजाचा अपमान आहे. भूमिपुत्र एकसंघ आहे, त्यामुळे आमच्या नेत्यांचा आणि समाजातील ज्येष्ठांचा अपमान करण्याचा अधिकार राजेंद्र पाटील यांना नाही. आजही अनेक ठिकाणी दलित आणि मागासवर्गीय समाजातील लोक अन्याय आणि अपमान सहन करत आहेत. अशा परिस्थितीत राजकीय स्थान असलेल्या व्यक्तींकडून जर असा प्रकार घडत असेल, तर त्यावर प्रशासनाने अधिक कडक भूमिका घेतली पाहिजे. कायद्यापुढे कोणताही व्यक्ती मोठा नाही, हे दाखवून देण्याची हीच वेळ आहे. समाजाला न्याय मिळावा, पीडितांना आधार मिळावा आणि भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी कठोर कारवाई होणे अत्यावश्यक आहे. न्याय हा केवळ शब्दांत नाही तर कृतीतून दिसला पाहिजे, तेव्हाच समाज खऱ्या अर्थाने सुरक्षित, समतावादी आणि न्यायप्रिय होईल.**
> **-रुपेश धुमाळ, अध्यक्ष, भाजप- पनवेल तालुका पश्चिम मंडल तसेच अध्यक्ष**
> **-आगरी कोळी कराडी संघर्ष सामाजिक संस्था.**

# गोंदेगाव प्रकाशमय – १५ व्या वित्त आयोगातून सणासुदीपूर्वी गाव उजळला दिव्यांच्या झगमगाटात

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**गोंदेगाव (ता. निफाड) :** सणासुदीच्या पार्श्वभूमीवर गोंदेगाव ग्रामपंचायतीने गाव विकासाच्या दृष्टीने एक प्रशंसनीय पाऊल उचलले आहे. १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून गावाबाहेरील प्रमुख मार्गांवर आधुनिक विद्युत प्रकाशव्यवस्था उभारण्यात आली असून, त्यामुळे संपूर्ण परिसर झगमगून निघाला आहे. दिव्यांच्या उजेडाने मच्छिंद्रनाथ मंदिर रस्ता, भवानी माता मंदिर रस्ता तसेच वाहेगाव–लासलगाव मार्ग परिसर प्रकाशमय झाला आहे.या उपक्रमाचे उद्घाटन गुरुवर्य तात्या बाबा यांच्या हस्ते मंगलमय वातावरणात करण्यात आले. सरपंच अनिल रणशूर यांच्या पुढाकाराने तसेच ग्रामपंचायतीतील सर्व सदस्यांच्या सहकार्याने हे काम वेगाने पूर्ण करण्यात आले.

यावेळी सरपंच अनिल रणशूर, सदस्य प्रविण नाईक, योगेश भोसले, शांताराम कांगणे, कुसुमबाई भोसले, विमल साळवे, मुक्ताबाई कांगणे, मनिषा कांगणे, शब्बीर शेख, सुरेश बर्डे, ग्रामविकास अधिकारी अमोल भारती आदी मान्यवर उपस्थित होते. उद्घाटनावेळी बोलताना सदस्य योगेश भोसले म्हणाले, "गावातील धार्मिक स्थळे आणि मुख्य रस्त्यांवर वीजप्रकाश व्यवस्था करणे ही ग्रामस्थांची जुनी मागणी होती. सणासुदीच्या काळात गाव उजळविण्याचा हेतू म्हणजे सौंदर्य आणि सुरक्षितता या दोन्ही गोष्टी साध्य करणे."



ग्रामविकास अधिकारी अमोल भारती यांनीही ग्रामपंचायतीच्या कामकाजाचे कौतुक करत, "ग्रामपंचायतीने नियोजनबद्ध पद्धतीने विकासकामे केली असून, ग्रामस्थांचा सहभाग वाढल्यास गावाचा विकास अधिक वेगाने होईल," असे सांगितले.ग्रामस्थांनी या कामाचे मनापासून स्वागत केले असून, "सणासुदीच्या काळात दिव्यांनी उजळलेले गाव पाहून खूप समाधान वाटते. ग्रामपंचायतीने योग्य वेळी केलेला हा उपक्रम कौतुकास्पद आहे," अशा प्रतिक्रिया नागरिकांकडून मिळाल्या.मच्छिंद्रनाथ मंदिर व भवानी माता मंदिर परिसरात दिव्यांच्या उजेडामुळे धार्मिक वातावरण अधिक मंगलमय झाले आहे. छोट्या मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्व जण या रस्त्यांवरील रोषणाई पाहण्यासाठी संध्याकाळी फिरायला जात आहेत. गावातील तरुणांनी सोशल मीडियावर या प्रकाशमय रस्त्यांचे फोटो शेअर करून ग्रामपंचायतीचे आभार मानले आहेत.गोंदेगाव ग्रामपंचायतीचा हा उपक्रम केवळ सणासुदीचा आनंद वाढवणारा नसून, ग्रामविकासाच्या दिशेने घेतलेले प्रेरणादायी पाऊल ठरत आहे.

# धम्मचक्र प्रवर्तन दिन निमित्त सम्राट अशोका बुद्ध विहार,भिम नगर मेंडका येथे - रठ्ठपाल थेरो भंतेजींची श्रिलंका यांचे प्रेरणादायी धम्मदेशना

**मुदखेड प्रतिनिधी – प्रकाश गवारे**

मेंडका (ता. मुदखेड) येथील सम्राट अशोका बुद्ध विहार येथे ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात, पारंपरिक श्रद्धा आणि सांस्कृतिक तेजात साजरा करण्यात आला. पहिल्या श्रेत्रात सम्राट अशोका बुद्ध विहार येथील पंचशील धम्म धोज्याचे धोजारहण करण्यात आले व तशेंच एरीकेशन कॉलनी येथील पंचशील धम्म धोज्याचे धोजारहण करण्यात आले व

या निमित्ताने आयोजित भव्य धम्मसभेत उपस्थित राहून रठ्ठपाल थेरो भंतेजी यांनी

धम्मसभेची सुरुवात बुद्ध वंदना व त्रिशरण पंचशीलाने करण्यात आली. त्यानंतर सर्व उपासक- उपाशीका यांच्या वतीने प्रमुख भिक्खू रठ्ठपाल थेरो यांचे मान्यवर व उपस्थित धम्म सेवकांच्या हस्ते स्वागत करण्यात



आले. कार्यक्रमास परिसरातील बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**भंते रठ्ठपाल थेरो यांच्या मार्गदर्शनातील जीवनमूल्यांची शिकवण**

भंतेजींनी आपल्या विचारमूलक धम्मदेशनेत सांगितले की –"धम्म हा जीवन परिवर्तनाचा मार्ग आहे. मन:शांती, करुणा, समता आणि बंधुत्व या चार स्तंभांवर धम्मसंस्कार उभे आहेत. द्वेष, मत्सर, क्रोध आणि अहंकार यांचा त्याग करूनच खऱ्या अर्थाने मानवता फुलते.

# चिंचोली नकीब येथील मातंग समाजाच्या युवकांचा घात कि पात . मृत्यू संशयाच्या भोवऱ्यात

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रतिनिधी.. सतिश लोखंडे**

फुलंब्री तालुक्यातील चिंचोली नकीब येथील मयत तरुण गोकूळ सुरेश दणके हा दिनांक .२ ऑक्टोबर 2025 रोजी कामावर गेला परंतु तो त्या दिवशी घरी परत आलाच नाही ... घरच्यांनी त्याचा बराच शोधाशोध केला मात्र तो मिळाला नाही. ०३ ऑक्टोबर रोजी वडोद बाजार पोलिस ठाणे हद्दीतील बाबरा शिवारातील तलावातील फक्त दोन ते तीन फुट खोल पाण्यात त्याचा अर्ध नग्न अवस्थेत संशयास्पद मृत्यू आढळून आला. मयताच्या कुटुंबाचा आरोप आहे कि जुन्या वादातून आमच्या मुलाची हत्या करण्यात आली आहे. व हि



घटना कट रचून घातपात केल्याचे सांगत आहे. ज्या ठिकाणी मयत गोकुळ दणके याचा मृतदेह आढळून आला त्याच्या काही अंतरावर संशयित आरोपीचे घर आहे. ०२ ऑक्टोबर ते आज रोजी १६ ऑक्टोबर पर्यंत पंधरा दिवसांच्या कालावधीत पोलिस प्रशासन नुसता गुन्हा दाखल करून घेण्यास चालढकल पणा करत आहे. दिनाक. १३ ऑक्टोबर रोजी लहुजी क्रांती सेनेच्या सिल्लोड तालुका वतीने वडोद बाजार पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक सुनील इंगळे तसेच पोलिस उपनिरीक्षक सचिन क्षिरसागर यांची भेट घेऊन त्यांना सदर घटनेमध्ये गुन्हा दाखल करून संशयित आरोपींना अटक करावी या मागणीसाठी निवेदन देण्यात आले. सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील इंगळे यांनी सांगितल्याप्रमाणे काल मयताचे पिडीत कुटुंब दुपारपासून ते सायंकाळ पर्यंत गुन्हा दाखल करण्यासाठी वडोद बाजार पोलिस ठाण्यात ठाण मांडून बसले होते. तरी सुद्धा गुन्हा दाखल करण्यात आला नाही. तरी पोलिस प्रशासनाने गुन्हा दाखल करून गुन्हेगारास तात्काळ अटक करावी असे मयत कुटुंबाचे म्हणणे आहे..

# असकॅड अंतर्गत पशुधन आरोग्य मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार

## पशुसंवर्धन विभाग पुसद तर्फे आयोजन




**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

**पुसद :** पशुसंवर्धन विभाग, पुसद यांच्या तर्फे असकॅड (AS-CAD) अंतर्गत पशुधन आरोग्य व रोग नियंत्रण विषयक एक व्यापक मार्गदर्शनपर कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.या कार्यक्रमास तालुक्यातील सर्व पशुसखी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घेण्यात आला. कार्यक्रमात जिल्हा उपयुक्त श्री. मंगेश काळे, सहाय्यक आयुक्त श्री. अलोने, तसेच सहाय्यक आयुक्त डॉ. तुषार बावणे यांनी पशुधन आरोग्य,रोग नियंत्रण व लसीकरण मोहीम यांचे महत्त्व यावर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी पशुसखींच्या माध्यमातून ग्रामीण पातळीवर पशुधन आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यावर भर दिला.पशुधन विकास अधिकारी डॉ.प्रशांत चव्हाण यांनी शेळीपालनातील रोगनियंत्रण,प्रतिबंधात्मक उपाय आणि आधुनिक पशुवैद्यकीय पद्धती याविषयी माहिती देतशेळीपालकांसाठी उपयुक्त मार्गदर्शन केले.तसेच डॉ.दिनेश पवार यांनी पशुसखींच्या कार्यातील अडचणी, पशुपालकांशी संवाद व सेवेतील सातत्य यावर प्रेरणादायी भाषण केले.यावेळी पशुधन विकास अधिकारी डॉ.अमित झा यांनी पशुधन आहार व पोषण व्यवस्थापन या विषयावर माहिती देत संतुलित आहाराच्या गरजेवर प्रकाश टाकला.त्यांनी दुग्धोत्पादन वाढवण्यासाठी योग्य पोषणतत्त्वांचे महत्त्व अधोरेखित केले.कार्यक्रमास सहायक आयुक्त डॉ.दत्तात्रय झंझाड, पशुधन विकास अधिकारी डॉ. सुशील चव्हाण सर,तसेच डॉ. स्नेहल चव्हाण मॅडम यांची विशेष उपस्थिती लाभली. मान्यवरांनी पशुसखींच्या ग्रामीण कार्याची दखल घेत त्यांना प्रोत्साहन दिले.या कार्यक्रमात पुसद तालुक्यातील सर्व पशुधन पर्यवेक्षक,पशुसखी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन पशुसंवर्धन विभागाच्या वतीने करण्यात आले असून,पशुधन क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची सातत्याने अंमलबजावणी केली जाणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

# तालूका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र ईटकरे अखेर सेवानिवृत्त

**दैनिक युवक आधार**
**उरण शहर प्रतिनिधी सायली साळुंके**

बुधवार दि15ऑक्टोबर2025 रोजी इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय, उरण येथे तालूका आरोग्य अधिकारी डॉ . राजेंद्र ईटकरे यांचा "निरोप समारंभ" डॉ बी एम कालेल , वैद्यकीय अधीक्षक, इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उरण यांच्या वतीने आयोजित करण्यात आला

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैद्यकीय अधीक्षक डॉ. बी एम कालेल यांनी करतेवेळी डॉ ईटकरे यांच्या शांत, संयमी आणि सर्वांना बरोबर घेऊन करण्याची त्यांची पद्धत तसेच कितीही मोठा प्रसंग असेल तरी शांत पणे विचार करून त्या प्रसगाला सामोरे जाणे हे स्वभाव वैशिष्ट्ये विषद केले आणि उपस्थीतांचे स्वागत केले.

या कार्यक्रमाला उरण पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री हानिफ मुलानी , उरण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री समिर जाधव, कामगार नेते श्री संतोष पवार, उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष दैनिकसुधाकर पाटील, ॲड. राजेंद्र मढवी आणि इंदिरा गांधी ग्रामीण रूग्णालयातील डॉक्टर्स आणि नर्सेस तसेच इतर स्टाफ मोठ्या संखेने आत्मीयतेने उपस्थित हते.*



या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री हानिफ मुलानी यांनी सांगितले डॉ राजेंद्र ईटकरे हे एक सेवाभावी वृत्तीने सेवा देणारे खर्या अर्थाने जनसेवा हिच ईश्वर सेवा आहे या उक्तीप्रमाणे काम करणारे डॉक्टर आहेत हे या शासकीय सेवेतील २५ वर्षांपासून मी पाहतो आहे असे गौरवोद्गार काढले आणि आपण जनतेला उत्तम सेवा देणे क्रमप्राप्त आहे हे आपण कधीही विसरून चालणार नाही असे उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कामगार नेते आणि कोवीड कालावधीत तालूका समन्वयक संतोष पवार यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की खरोखर या कोवीड महामारीने भयभीत जनतेला आधाराची गरज होती आणि ती जबाबदारी शासकीय यंत्रणेने आमच्यावर विश्वास ठेवून सोपवीली आणि ती सर्वांच्या सहकार्याने फार पाडत असताना प्रत्येक रूग्ण हा वाचलाच पाहिजे या भावनेतून सेवा देत असताना तालूक्यातील सेवाभावी वृत्तीच्या अनेक विविध क्षेत्रातील कार्यकर्त्यांचे योग्य वेळी योग्य सहकार्य मिळाले आणि म्हणूनच काम करणे अधिक शक्य झाले.

यावेळी उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष श्री सुधाकर पाटील, ॲड राजेंद्र मढवी यांनी मनोगत व्यक्त करताना औद्योगिक दृष्ट्या अतीशय प्रगत असलेला तालूका म्हणजे उरण तालूका अशी उरण तालूक्याची ओळख परंतू तालूक्यात सुसज्ज असे एकही मोठे रूग्णालय नसतानाही कोवीड कालावधी संपूर्ण देश जरी लॉक डाऊन मध्ये होते तरी देशादेशांतर्गत मालाची म्हणजेच अन्न धान्यासह वैद्यकीय साधने सामग्रीसह ईतर अनेक प्रकारच्या मालाची आवक जावक करणारे त्या माध्यमातून या पोर्ट ईंडस्ट्री द्वारे आयात निर्यात करणार्या कामगारांचे काम मात्र सुरूच होते. हा आला जेएनपीटी , शिपींग इंडस्ट्री विविध गोडाऊन कोडिंग - अनलोडींगच्या कामाने दिवस - रात्र प्रभावीत असलेला उरण तालुका असल्यामुळे जागतीक किर्तीच्या या जेएनपीटी बंदरातील कामकाज सुरुच होते.

या आपल्या उरण तालुक्यातील जनतेला खरोखर त्याकाळात डॉ . राजेंद्र ईटकरे, उरण तालुका आरोग्य अधिकारी यांनी तत्कालीन तहसीलदार श्री भाऊसाहेब अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली, तत्कालीन वैद्यकीय अधिक्षक डॉ. मनोज भद्रे, तालूका समन्वयक श्री संतोष पवार, उरण नगरपरिषद आणि आपल्या उरण तालुक्यातील विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी यांचे कोऑर्डिनेशन सुसंगत असल्यामुळे तसेच तालुक्यातील डॉक्टर्स असोसिएशनच्या माध्यमातून सर्व सदस्यांचे सहकार्य उत्तम मिळाले या सर्वांना एकत्र करणारे डॉक्टर विकास मोरे डॉ सुरेश पाटील, डॉ सत्या ठाकरे, डॉ घनःश्याम पाटील आणि या सर्व डॉक्टर्सना मोलाचे मार्गदर्शन करणारे डॉ. प्रफुल्ल सामंत या सर्वांच्या सहकार्याने तसेच एकजुटीने महाभयंकर कोवीड महामारीवर मात करण्याचे कार्य अनेक अडचणींवर मात केली आणि बहुसंख्य नागरिकांचे प्राण वाचले. या वेळी अतिशय जबाबदारीने पार पाडत असताना डॉ. राजेंद्र ईटकरे यांनी हे आरोग्य सेवेचे कार्य दिवस रात्र करत असताना आपल्या सहकाऱी कर्मचाऱ्यांना आपल्या कुटुंबातील सदस्यांप्रमाणे जपले हे सर्वशृत असल्यामुळे ह्या सर्व आठवणींना उजाळा मिळाला आणि हा निरोप समारंभ कार्यक्रम अतीशय हृदयस्पर्शी ठरला

# भोई समाजाचा वापर फक्त मतदाना पुरताच शासनाचे सातत्याने दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे**

पांढरकवडा :राजकारण हे समाज हितासाठी असायला पाहिजे, परंतु राजकारण हे फक्त स्वहितासाठी केल्या जात आहे असे चित्र सध्या पाहाव्यास मिळत आहे. याच प्रकारची परिस्तिथी भोई समाजाबद्दल पाहावयास मिळत आहे.लोकसभा,विधानसभा,नगर परिषद,पंचायत समिती,जिल्हा परिषद,ग्रामपंचायत निवडणुकीच्या काळात मतांसाठी भोई समाजाकडे मोठ्या अपेक्षेने पाहिले जाते, मात्र निवडणूक संपताच या समाजाकडे शासनाचे आणि लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष होते,अशी खंत व्यक्त केली जात आहे. सामाजिक,आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या भोई समाजाच्या समस्या वर्षानुवर्षे तशाच राहिल्या आहेत. रोजगार,शिक्षण,घरकुल, आरोग्य सुविधा अशा अनेक बाबतीत भोई समाजाला आजही संघर्ष करावा लागतो.विविध राजकीय पक्ष केवळ निवडणुकीपुरते आश्वासने देतात,पण प्रत्यक्ष कृती दिसत नाही.



भोई समाजाला फक्त मतदार म्हणून पाहिले जाते. निवडणुकीनंतर कोणीही मागे वळून बघत नाही,असे भावना भोई समाजबांधव व्यक्त करत आहेत.शासनाने आणि लोकप्रतिनिधींनी भोई समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस पावले उचलावीत,अशी मागणी जोर धरत आहे. जिल्ह्यातील अनेक भागांत भोई समाजाचा पारंपरिक व्यवसाय म्हणजे मासेमारी धरणे,तलाव आणि नद्या हे या समाजाच्या उपजीविकेचे मुख्य स्रोत आहेत. मात्र, भोई समाजाचा उदरनिर्वाह संकटात सापडला आहे.पेसा अंतर्गत आदिवासी क्षेत्रातील नैसर्गिक संसाधनांवर स्थानिक स्वराज्य संस्थांचा अधिकार आहे.त्यामुळे अनेक ठिकाणी ग्रामपंचायतींनी धरणे व तलाव स्वतःच्या ताब्यात घेतले असून,भोई समाजाला परवानगी न देता थेट निविदा पद्धतीने इतर समाजाच्या व्यक्तीना मासेमारी करण्याकरिता परवाना देण्यात येत आहे. परिणामी पारंपरिक हक्क गमावलेला भोई समाज बेरोजगारीच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे.भोई समाजाचा उपयोग केवळ निवडणुकी पुरता,म्हणजेच मतदानाच्या वेळीच लक्षात घेतले जाते,असा आरोप स्थानिक भोई समाजबांधवांनी केला आहे. निवडणुकीच्या काळात मतांसाठी भोई समाजाचे लाड केले जातात, पण निवडणुका संपल्यानंतर त्यांना मूळ व्यवसायासाठीही सुविधा दिल्या जात नाहीत.यावर शासनाने लक्ष घालून भोई समाजाच्या पारंपरिक हक्कांचे रक्षण करणे गरजेचे आहे. ग्रामपंचायतींनी स्थानिक पारंपरिक मच्छीमारांना प्राधान्य देऊन मासेमारी हक्क देणे अपेक्षित आहे. म्हणून भोई समाजातील लोकांना फक्त मतदार या नात्याने न बगता भारतीय नागरिक या नात्याने बघून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपाययोजना सरकारने कराव्यात अशी मागणी भोई समाजाकडून करण्यात येत आहे.

# “मानसिक आरोग्य व मुलींचे हक्क याबाबत विद्यार्थ्यांची प्रेरणादायी जाणीव : बेलापूर विधी सेवा समितीचा उपक्रम"

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर उरण रायगड**

नवी मुंबई बेलापूर तालुका विधी सेवा समिती, बेलापूर कौटुंबिक न्यायालय आणि नवी मुंबई वकील बार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने NMMC शाळा क्र. 114, सेक्टर 7, बोनकोडे, कोपरखैरणे येथे कायदेशीर जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात World Mental Health Day आणि International Girl Child Day या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.शाळेतील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या यशस्वी आयोजनाबद्दल शाळेच्या प्रिन्सिपल श्रीमती महाजन यांचे बेलापूर लिगल एड डिपार्टमेंट आणि बेलापूर वकील बार संघटना तर्फे सार्वजनिक आभार मानण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सह दिवाणी न्यायाधीश श्री. एस. डी. सोनावणे साहेब होते. ॲड. बलराज भंडारे यांनी कार्यकारी प्रभारी म्हणून समन्वय साधला. तसेच ॲड. दत्ता जगताप, ॲड. गणेश शेलार, ॲड. सरिता सैंदाणे, ॲड. शरद कांबळे, ॲड. स्नेहल कदम आणि ॲड. अनिता शिंदे* यांची प्रमुख उपस्थिती होती.






लिगल एड डिपार्टमेंट तर्फे श्री. पटेल भाऊसाहेब, मिस. स्वाती मोरे आणि सहकाऱ्यांनी बहुमूल्य सहकार्य केले.सन्माननीय सह दिवाणी न्यायाधीश श्री. सोनावणे साहेब तसेच ॲड. बलराज भंडारे, ॲड. गणेश शेलार, ॲड. सरिता सैंदाणे व ॲड. स्नेहल कदम यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मानसिक स्वास्थ्य जपण्याचे मार्ग, मुलींच्या हक्कांविषयी सजगता व आत्मविश्वासाने पुढे जाण्याचे महत्त्व अधोरेखित केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रिन्सिपल श्रीमती महाजन यांनी केले, तर समारोपपर भाषण ॲड. दत्ता जगताप यांनी देत बेलापूर वकील संघटनेतर्फे शाळा प्रशासन व सर्व उपस्थितांचे आभार मानले.या कार्यक्रमाला बेलापूर कोर्टातील अनेक वकील व कमिटी सदस्य उपस्थित होते.

# दिवाळीच्या पूर्वसंध्येला रविवारी 'बहुरूपी अशोक' चे मुंबई दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारण!

## रसिकांना दिवाळी फराळासोबत आनंद घेण्याचा दुग्धशर्करा योग !

**दैनिक युवक आधार**

**उलवे,वार्ताहर :** ज्येष्ठ अभिनेते, `पद्मश्री' आणि `महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने सन्मानित असलेले अवलिया अशोक सराफ यांचा २८ सप्टेंबरला उलवे नगरीतील भूमिपुत्र भवन येथे भव्यदिव्य नागरी सत्कार करण्यात आला. हा नागरी सत्कार रायगड, नवी मुंबईच्या जनतेच्या वतीने शेलघर येथील `यमुना सामाजिक शैक्षणि संस्थे'चे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी आयोजित केला होता. यावेळी अशोक सराफ यांच्या चित्रपट, नाट्यसृष्टीतील कारकिर्दीवर आधारित नरेंद्र बेडेकर निर्मित `बहुरूपी अशोक' हा रसिकांची मने जिंकणारा कार्यक्रम झाला होता. मुंबई दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर




रविवारी (ता. १९ ऑक्टोबर) सायंकाळी ६ वाजता `बहुरूपी अशोक' याच नावाने नागरी सत्काराचा भव्यदिव्य कार्यक्रम प्रसारित होणार आहे. त्याची निर्मिती वैष्णो व्हिजनचे निर्माता-दिग्दर्शक जयू भाटकर यांनी केली आहे. त्यामुळे रसिकांना दिवाळीच्या पूर्वसंध्येला `बहुरूपी अशोक'ची मेजवानी चाखायला मिळणार आहे, तरी सर्व रसिकांनी दिवाळीच्या फराळासोबत या कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन यमुना सामाजिक संस्थेचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत आणि सौ. शुभांगीताई घरत यांनी केले आहे. तुफान पावसातही भूमिपुत्र भवन त्यावेळी रसिकांनी तुडुंब भरले होते. अशोक सराफ यांना सॅल्यूट करण्यासाठी उलवे नगरी सजली होती. माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे, वनमंत्री गणेश नाईक, रायगडचे खासदार सुनील तटकरे, खासदार रामशेठ ठाकूर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा नागरी सत्कार चार चांद लावणारा ठरला.

त्यामुळे अशोक सराफ यांच्यावर प्रेम करणाऱ्या रसिकांना `बहुरूपी अशोक' हा रसिकांची मने जिंकणारा नागरी सत्काराचा कार्यक्रम पाहाण्याची संधी दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर रविवारी सायंकाळी ६ वाजता मिळणार आहे. `बहुरूपी अशोक'च्या रूपाने रसिकांना दिवाळीच्या पूर्वसंध्येला फराळासोबत आनंद घेण्याचा दुग्धशर्करा योग जुळून आला आहे. त्यामुळे मायबाप रसिकांनी हा कार्यक्रम आवर्जून पाहायलाच हवा.



**येरोळ ता.शिरूरआनंतपाळ येथील वि.का.से.सहकारी सोसायटीतर्फे शेतकरी सभासदांना दिपावळी निमित्त चेअरमन अतुल पाटील गंभीरे यांच्या हस्ते पाच कि.मोफत साखर वाटप करण्यात आली. यावेळी शेतकरी सभासद उपस्थित होते.**

**(दैनिक युवक आधार )**

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# नगरपरिषद निवडणूक लढवीणारे इच्छुक उमेदवार समाज माध्यमावर सक्रिय; प्रभागनिहाय इच्छूकांची मोर्चेबंधणी

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी. रणजीतसिह. ठाकुर.**

रिसोड नगरपरिषद निवडणुकीकरिता इच्छुक असणाऱ्या उमेदवारांची सोशल मीडियावर कमालीची सक्रियता वाढली आहे. आपल्या पक्षाचा, नेत्याचा पुरेपूर उपयोग करून मीच निष्ठावंत आणि योग्य उमेदवार असल्याचा गाजावाजा केला जात आहे. नगरपरिषद निवडणूक मध्ये निवडणुकीला उभे राहणारे अनेक इच्छुक प्रत्येक प्रभागात पूर्णपणे तयारीला लागले आहेत. आपण ज्या पक्षाचे काम करतो त्या पक्षाच्या नेत्याचा फोटो लावून प्रभाग क्रमांक चे नाव देऊ आपणच अधिकृत उमेदवार असल्याचा गाजावाजा सोशल मीडियाच्या माध्यमातून इच्छुक उमेदवार करीत आहेत " इच्छा तिथे मार्ग" या उक्तीप्रमाणे अति इच्छुक उमेदवारांचे पक्षाचे तिकीट सुद्धा निश्चित असल्याचे बोलले जात आहे.उमेदवारी कवा पण सध्या आपलीच हवा असा







आभास निर्माण केला जात आहे. सध्या प्रत्येक कार्यक्रम निवडणुकीतील नफा तोटा लक्षात घेऊन साजरा केला जात आहे. काही इच्छुक गुडघ्याला बाशिंग बांधून तयार झाले आहेत.आपल्याशी बांधिलकी जोपसणाऱ्यांची फळी तयार करून प्रतिस्पर्ध्यांना मात देणारे मतं जमा करण्यासाठी मतदारांच्या बाळा सह साहेबांना ही गोंजारल्या जात आहे. रिसोड नगरपरिषद मध्ये कधी नव्हे ती चुरस यावेळेस 2025 च्या निवडणुकीत पाहायला मिळणार आहे.माजी खासदार, विद्यमान आमदार भावनाताई गवळी यांच्या डॅशिंग एन्ट्रीने रिसोड शहराच्या राजकीय वर्तुळात त्रिधात्रिपट उडाली आहे. राजकीय सांभाव्यतेचा अंदाज बांधणे कठीण झाले आहे.भावनाताई गवळी यांची प्रतिमा जनसामान्यात कमालीची सकारात्मक निखरली आहे.भावनाताई गवळीच शहराचा विकास करू शकतात अशी चर्चा चौका चौका ऐकायला मिळत आहे. समस्याही कोणतीही असो उत्तर मात्र बाईंच्या रूपात शोधत आहेत. नगर परिषद निवडणुकीच्या दृष्टीने भावना गवळी यांनी आपले राजकीय डावपेच अद्याप उजागर केले नसले तरी त्यांची नगरपरिषदे विषयीची रणनीती तयार झाली आहे. नगराध्यक्ष पदापासून जवळपास सर्व प्रभागातील सर्व उमेदवार कामाला लागले आहेत. भावनाताई गवळी यांचा आदेश अंतिम मानणारे कार्यकर्ते निवडणूक रिंगणात पूर्ण ताकदीरशी उतरले आहेत. इच्छुकांच्या अनेकांची इच्छापूर्ती होईल किंवा नाही हे सांगणे कठीण असले तरी जन भावना आणि आमदार भावना यांची युती झाली तर शहरास शहराच्या विकासाची गती मोठ्या प्रमाणात होईल असशी अपेक्षा मतदार व्यक्त करीत आहेत.

दुसरीकडे आमदार अमित झनक यांनी महाविकास आघाडी संयुक्तपणे नगराध्यक्ष पद लढवेल असे संकेत दिले आहेत.परंतु प्रभाग निहाय विचार करता आमदारांच्या इच्छुक कार्यकर्त्यांची यादी फार मोठी असणार आहे. एकाच प्रभागातून अनेकांपैकी योग्य उमेदवाराला पसंती देने आमदारासाठी पाहिजे तेवढे सहज असणार नाही. आमदार झनक यांचे रिसोड शहरात राजकीय अस्तित्व यापूर्वी कधीही नगरपरिषद निवडणुकीत जाणवले नाही परंतु यावर्षी त्यांचे परंपरागत राजकीय विरोधक यांना शह देण्यासाठी आमदाराचे कार्यकर्ते जिद्दीने आणि जिंकण्याच्या निश्चयाने कामाला लागले आहेत आमदार अमित झनक यांच्या कामाचा आढावा देत यापुढेही आमदाराच्या माध्यमातून निधी खेचून आणून आपण कसा विकास करू शकतो हा युक्तिवाद उमेदवार मतदारांशी साधत आहेत.

रिसोड नगरपरिषद व अन्य कोणत्याही निवडणुकीच्या माध्यमातून ज्यांचे वर्चस्व आजतागायात रिसोड शहरावर कायम आहे असे माजी खासदार अनंतराव देशमुख यांचे राजकीय पारडे आजही जड असल्याचे बोलले जात आहे. अनंतराव देशमुख यांनी नगरपरिषदेचा अध्यक्ष पदासाठीचा कोणताही उमेदवार दिलेला नसला तरी त्यांनी दिलेला उमेदवार नगराध्यक्ष होईल असा ठाम विश्वास व्यक्त करणारा मतदार त्यांच्या निर्णयावर ठाम आहे.अनंतराव देशमुख यांच्या कडून लढणाऱ्या इच्छुकांची संख्या सर्वाधिक आहे त्यांना अनेक प्रभागात बंडोबांना थंड करण्याची युक्ती शोधावी लागणार आहे. बंडोबाच्या बंडाचा फटका आपल्या मर्जीतील उमेदवारांना बसणार नाही याची नेहमीप्रमाणे देशमुख यांच्याकडून काळजी केली जाईल. शहरातील नगरपरिषद च्या काही प्रभागात आपले वर्चस्व आबाधित ठेवणारे भगवानराव क्षीरसागर हे अनंतराव देशमुख यांच्या सोबत राहतील का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. आणि याचे उत्तर सकारात्मक आल्यास अनंतराव देशमुख यांचे बालेकिल्ले असणारे प्रभाग अगदी सहजपणे पुन्हा त्यांच्याकडेच राहतील यामध्ये शंका नाही या निवडणुकीसाठी मुस्लिम उमेदवार सोशल मीडियावर सक्रिय नसले तरी मुस्लिम बहुलक प्रभागातून कशी निवडून येतील याविषयी समाजमंथन गतिमान असल्याची माहिती मिळते आहे. एकूणच काय यावर्षी निवडणूक अतिशय चुरशीची आणि विकासाचा शोध घेणारी ठरणार आहे. सर्व उमेदवार सोशियल मीडियाचा पुरेपूर वापर करीत आहेत आणि जनताही त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत आहेत. महिलांना राखीव असणाऱ्या जागेसाठी त्या महिलांचे पती उत्साही दिसत आहेत.बायकोच्या संमतिने पतीदेव कसा प्रभागाचा कारभार करण्याची जोरदार तयारी करीत आहेत.

## कळंबोलीतील पाण्याच्या प्रश्नाला न्याय मिळवण्यासाठी भाजपचा धडक मोर्चा!




**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

कळंबोली शहरात गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या पाणीटंचाईच्या गंभीर समस्येकडे वारंवार लक्ष वेधूनही सिडको प्रशासनाने कोणतीही ठोस दखल घेतली नाही.नागरिकांच्या या न्याय्य हक्कासाठी आज भारतीय जनता पार्टीच्या वतीने शहराध्यक्ष श्री. अमरजी पाटील यांच्या नेतृत्वाखाली कळंबोली शहरात धडक मोर्चा काढण्यात आला.

सोबत भाजपा माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कळंबोलीतील असंख्य रहिवासी मोठ्या संख्येने सिडको कार्यालयासमोर उपस्थित राहून प्रशासनाकडे ठोस मागणी नोंदवली. पाणी हा मूलभूत हक्क आहे — नागरिकांना त्यांच्या हक्काचं पाणी मिळालंच पाहिजे!भाजप सदैव जनतेच्या हक्कासाठी लढत राहील!

## आंतर-महाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगु काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यू पनवेल(अधिकारप्रदत्त स्वायत्त) आणि मुंबई विद्यापीठ यांच्या समन्वयाने आंतर महाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धा ८ ऑक्टोबर ते १६ऑक्टोबर पर्यंत आयोजित करण्यात आली होती.

मुलांच्या गटातील या आंतर-महाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धेचे उद्घाटन चांगु काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य व मुंबई शहर झोन-१चे उपाध्यक्ष प्रो. डॉ. एस.के.पाटील यांनी केले. त्याचबरोबर मुंबई शहर झोन-१सचिव डॉ.मनोज वर्मा ,मुंबई शहर झोन-१ स्पर्धा सचिव डॉ. व्ही. बी. नाईक व मुंबई शहर झोन-१ स्पर्धा सह-सचिव पूनम मुजावर यांची उपस्थिती लाभली.

या स्पर्धेमध्ये ५१ महाविद्यालयातील मुलांच्या संघानी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेमध्ये उपांत्य फेरीत दाखल झालेले पिल्लई महाविद्यालय, पी.व्ही.पी. महाविद्यालय, जि. एन. खालसा, आणि सरस्वती




इंजिनीरिंग महाविद्यालय या प्रमाणे असून झालेल्या स्पर्धेमध्ये सरस्वती इंजिनीरिंग महाविद्यालयाणे चतुर्थ स्थान व जि.एन.खालसा महाविद्यालयाने तृतीय स्थान पटकावले तर पिल्लई महाविद्यालयाने अंतिम सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम विजेते पद मिळवले आणि पी.व्ही.पी. महाविद्यालयाला द्वितीय स्थानावर समाधान मानावे लागले.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही. बी. नाईक, सहसंचालक प्रा. अनिल नात्की, प्रा. भरत जितेकरव प्रा. प्रतिज्ञा पाटील, जिमखाना विभागाचे सर्व सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले.

## एड्युक्रॉन प्रा.लि.ला 5G इनोव्हेशन हॅकाथॉन 2025 मध्ये दुसरा क्रमांक सुरक्षित डिजिटल ताबा व्यवस्थेत नवे युग

### इंडिया मोबाइल कॉंग्रेसमध्ये नागपूरच्या स्टार्टअपला राष्ट्रीय सन्मान

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी सतीश कडू**
**संपादक नागपूर विभाग**

**नवी दिल्ली** : नागपूर स्थित एड्युक्रॉन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने 5G इनोव्हेशन हॅकाथॉन 2025 मध्ये स्टार्टअप / MSME / R&D ऑर्गनायझेशन या श्रेणीत दुसरा क्रमांक (फर्स्ट रनर-अप) पटकावला आहे. ही स्पर्धा भारत सरकारच्या संचार मंत्रालयाच्या दूरसंचार विभागाने आयोजित केली होती. विजेत्यांना केंद्रीय संचार राज्यमंत्री डॉ.सी. एन.अश्वथ नारायण पेम्मासनी यांनी इंडिया मोबाइल कॉंग्रेस 2025 दरम्यान सन्मानित केले.

देशभरातून आलेल्या 1000 हून अधिक नवकल्पनांमध्ये, एड्युक्रॉनचा IoT आधारित स्मार्ट कस्टडी व ट्रान्सपोर्ट सिस्टम प्रकल्प नावारूपास आला. या प्रकल्पाचे नेतृत्व आनंद वर्धन तिवारी आणि प्रशांत शाह यांनी केले असून, तो विश्वेश्वरैया नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (VNIT), नागपूर यांच्या सहकार्याने साकारला गेला. प्रकल्पाला नागपूर रेंजचे पोलीस महानिरीक्षक श्री संदीप पाटील (IPS) यांचे मार्गदर्शन लाभले. ही अभिनव प्रणाली सध्या मुख्यमंत्र्यांच्या 150 दिवसांच्या कार्यक्रमा अंतर्गत मौदा पोलीस ठाण्यात मुद्रेमाल व्यवस्थापन प्रणाली (Muddemal Management System) म्हणून प्रायोगिक अंमलबजावणी साठी सुरू करण्यात आली आहे. या प्रणालीमुळे जप्त वस्तूंचे सुरक्षित, डिजिटल व पारदर्शक व्यवस्थापन शक्य होईल. हीच तंत्रज्ञान प्रणाली परीक्षा प्रश्नपत्रांच्या सुरक्षित साठवण आणि वाहतुकीसाठी देखील वापरली जाऊ शकते, ज्यामुळे प्रश्नपत्र गळती किंवा फेरफार रोखता येईल. एड्युक्रॉन प्रा.लि. ही नागपूरची अग्रगण्य तंत्रज्ञान कंपनी असून, ती डिजिटल इंडिया आणि आत्मनिर्भर भारत मोहिमेला बळकटी देत आहे.

## भाविकांची होतेय गैरसोय

### पाणी व स्वच्छतागृहांची दुरावस्था हरिहरेश्वर ग्राम पंचायतीने लक्ष देण्याची गरज







**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी**

**हरिहरेश्वर** – दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हरिहरेश्वर या पवित्र तीर्थक्षेत्राला दररोज हजारो भाविक भेट देतात. स्वयंभू शंकर आणि काळभैरव या प्राचीन देवालयांमुळे या गावाला धार्मिक आणि ऐतिहासिक अशी विशेष ओळख लाभली आहे.

पण या तीर्थक्षेत्रात अस्थी विसर्जन, दशविधी तसेच विविध धार्मिक विधी करण्यासाठी मुंबई, पुणे आणि आसपासच्या जिल्ह्यांतून येणाऱ्या भाविकांना मात्र मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. ज्या ठिकाणी ही धार्मिक कार्ये पार पाडली जातात, त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची कोणतीही सोय नाही, तसेच स्वच्छतागृहांची स्थिती अत्यंत दयनीय झालेली दिसते आहे.

तीर्थक्षेत्राला येणाऱ्या भाविकांना स्वच्छता आणि पाण्याच्या मूलभूत सुविधा न मिळणे हा गंभीर विषय असून ग्रामपंचायत हरिहरेश्वर यांनी याकडे तातडीने लक्ष देणे अत्यावश्यक आहे.

या ठिकाणी स्वच्छतागृहांची दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याची सोय आणि परिसराची स्वच्छता राखली गेल्यास हरिहरेश्वरची "दक्षिण काशी" ही ओळख अधिक प्रतिष्ठित होईल आणि भाविकांचा अनुभव अधिक समाधानकारक ठरेल.

**भाविकांची मागणी:**

ग्रामपंचायतीने आणि संबंधित विभागांनी तातडीने या बाबीकडे लक्ष देऊन तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी ठोस उपाययोजना कराव्यात.

## पंचायत समिती कार्यालय सिल्लोड येथे जागतिक हात धुवा दिवस साजरा



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** 15 ऑक्टोंबर 2025 बुधवार रोजी जागतिक हात धुवा दिवसाच्या औचित्य साधून हात कसे धुवावे याचे प्रात्यक्षिक करून हात धुण्याचे महत्व समजावून सांगण्यात आले.लहान बाळांना भरवण्यापूर्वी,स्वयंपाकापूर्वी, जेवणापूर्वी, शौच विधीहून आल्यावर हात स्वच्छ साबणीने कसे धुवावे व आपल्या आरोग्याचे रक्षण कसे करावे याबाबत मार्गदर्शन करून हात धुवा दिवस पंचायत समिती कार्यालय सिल्लोड येथे साजरा करण्यात आला.यावेळी सर्व विभाग प्रमुख अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## येरगी बालिका पंचायत राज ने केला मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांचा सत्कार



**तालूका प्रतिनिधी:**
**महादेव उप्पे देगलूर**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत देगलूर येथील खानापूर रोडवरील महालक्ष्मी मंगल कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येरगी चे बालिका पंचायत राज समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मेघना कावली यांचा सत्कार करून गावात या अभियानांतर्गत चालू असलेल्या सर्व कार्यक्रमांची माहिती दिली.यावेळी उप मुख्यकार्यकारी अधिकारी दत्तात्रेय गीरी,गावचे सरपंच संतोष पाटील,गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे,विस्तार अधिकारी दत्तात्रेय कुरूदे,बालाजी उमाटे,ग्राम पंचायत अधिकारी राजेश तोटावाड,इरवंत कालिंगवार, आदी उपस्थित होते.

तसेच यावेळी बालिका पंचायत राजचे सरपंच अंजली वाघमारे,उपसरपंच पुनम सुर्यवंशी,तंटामुक्त अध्यक्ष शिवकांता भुरळे,पोलिस पाटील अनिता बागेवार,शालेय शिक्षण समिती अध्यक्ष सपना काळीगवार,महादेव कुंचगे,मोनिका माळगे,रुक्मिणी भुरूळे,रूद्रानी चैडके,आश्विनी पाचांळ,रितीका चिटकुलवार, हरीका तोटावार,आदी उपस्थित होते.

## पराग मिल्क फूड लिमिटेडच्या वतीने आष्टी तालुक्यातील दोन गावांना किराणा किट वितरण

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**

सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण म्हणून,पराग मिल्क फूड लिमिटेडने आष्टी तालुका अंतर्गत टाकळी अमिया,रुई नालकोल,गावातील गरजू लोकांना किराणा किट वितरित केले. या उपक्रमाद्वारे,अन्नसुरक्षा आणि गरिबांची मदत करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

या उपक्रमाचा उद्देश— गरजू लोकांना एक आधार देणे, जीवनमान सुधारणा, आपत्कालीन मदत इत्यादी.

"या कार्यक्रमाअंतर्गत,दोन गावातील टाकळीया अमिया,रुईनालकोल,नांदा गावातील 1020 परिवारांना किराणा किट दिली गेली,ज्यात तांदूळ,आडा,डाळ, तेल,साखर, बेसन, रवा, पोहे चहापुडा,मीठ,कपड्याची साबण,हळद पावडर,मिरची पावडर, डेटॉल साबण,इत्यादी आवश्यक पदार्थांचा समावेश होता.कंपनीचे मा.





देवेंद्रजी शहा साहेब, मार्फत मा ना. दिलीपराव वळसे पाटील साहेब,मा.खा. शिवाजीराव आढळराव पाटील साहेब, यांच्या मार्गदर्शना खाली कंपनीचे अधिकारी आणि मा. नायब तहसीलदार मोहिते साहेब,मा. धारक साहेब, कृषी उत्पन्न बाजार समिती कडा चे उपसभापतीमा. नामदेव धोंडे, सरपंच तात्यासाहेब नालकोल, उपसरपंच विष्णू मांढरे,माजी सरपंच संजय नालकोल,प्रवीण पाटील साहेब, शेख इलाही साहेब, बाळकृष्ण राऊत, पराग डेरी चालक रामदास चौधरी टाकळी अमिया,गोवर्धन सर पांढरी, सागर बनसोडे,व शरद नालकोल बाबासाहेब खिल्लारे, सुरेश गांजुरे,अजिनाथ नालकोल, बाळासाहेब नालकोल या दोन्ही गावातील सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते."

या उपक्रमामुळे कंपनी आणि स्थानिक समाज यांच्यातील विश्वास वाढेल तसेच गरजू लोकांना आवश्यक मदत मिळेल. भविष्यातही या प्रकारचे सामाजिक उपक्रम वाढवावेत ही अपेक्षा व्यक्त करता येईल

## ग्रामपंचायत पिंपळगाव पेठ येथे एक दिवस गावकऱ्यासोबत ग्राम दरबाराचे उपक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड : -** दि.15 ऑक्टोबर 2025 रोजी बुधवारी सकाळी 8:30 वाजता ग्रामपंचायत पिंपळगाव पेठ येथे तत्कालीन विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर दिलीप गावडे यांच्या संकल्पनेतील एक दिवस गावकऱ्यांसोबत (ग्रामदरबार) नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येऊन तेथे गटविकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड रत्नाकर पगारसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शासनाच्या विविध विभागांच्या विविध योजनांविषयी सर्व विभागातील अधिकारी यांनी ग्रामस्थांना माहिती देऊन योजनेचे निकष समजावून सांगण्यात आले.त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या तसेच ग्रामस्थांना मार्गदर्शन केले.सदर कार्यक्रमासाठी पंचायत समिती सिल्लोड येथील



विस्तार अधिकारी अण्णासाहेब गाडेकर, कृषी अधिकारी सुनील सुर्यवंशी, सहाय्यक कृषी अधिकारी सिरसाठ , केंद्रप्रमुख बडक, मुख्याध्यापक सुर्यवंशी , समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.शेख, प्रकल्प अधिकारी सुनिता सनांन्से , पशुसंवर्धन पर्यवेक्षक फुलार, पाणीपुरवठा विभाग अविनाश चौधरी कनिष्ठ अभियंता, गृहनिर्माण अभियंता शिंदे , जलसंधारण विभाग कर्मचारी,ग्राम महसुल अधिकारी बागुल, गावातील सर्व अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा सेविका, मुख्याध्यापक, सरपंच दिलीप जाधव, उपसरपंच कांताबाई भागवत, ग्रामपंचायत सदस्य, कदीर सय्यद, राजेन्द्र बेलेवार, व ग्रामपंचायत सदस्य,पत्रकार सदाशिव फुले,माजी सरपंच,माजी उपसरपंच,चेअरमन, ग्रामपंचायत अधिकारी अशोक महाकाळ, सर्व ग्रामपंचायत कर्मचारी व गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्यात जय भारतीय जनरल कामगार संघटनेचा विजय

## शेल इंडियाच्या कामगारांना तब्बल १ लाख २० हजार रुपये बोनस

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** देशातील सर्वात मोठा आणि आनंदाचा सण असलेल्या दिपावलीनिमित्त कामगारांना त्यांच्या आस्थापनांकडून बोनस दिला जातो. यंदा रायगड जिल्ह्यातील विविध औद्योगिक क्षेत्रांमध्ये बोनस वाटपाच्या चर्चांना वेग आला असताना, आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कामगारनेते जितेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या जय भारतीय जनरल कामगार संघटनेने कामगारांच्या हिताचे भक्कम प्रतिनिधित्व करून तळोजा औद्योगिक क्षेत्रातील शेल इंडिया मार्केट्स प्रायव्हेट लिमिटेड मधील कामगारांना यंदा तब्बल १ लाख २० हजार रुपयांचा सर्वाधिक बोनस मिळवण्यात यश संपादन केले आहे.

त्याचप्रमाणे पुढील वर्षी १ लाख



२५ हजार रुपये आणि त्या पुढील वर्षी १ लाख ३० हजार रुपये कामगारांना बोनस देण्यात येणार आहे. त्या संदर्भातील करार कंपनी आणि कामगार संघटनेत झाला. या करारावर व्यवस्थापनाच्यावतीने अधिकारी शशांक शेखर व गुलशन चौधरी यांनी तर संघटनेच्या वतीने अध्यक्ष जितेंद्र घरत यांनी तसेच कामगार प्रतिनिधींनी स्वाक्षऱ्या केल्या. या कंपनीतील बहुतांश कामगारांनी संघटनेचे नेतृत्व स्वीकारल्यानंतर त्यावेळी कामगारांना भरघोस पगारवाढ व सुविधा यापूर्वीच देण्यात आल्या. संघटनेच्या या यशामुळे कामगारांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, दिवाळीचा आनंद द्विगुणीत झाला आहे. आज संघटनेचे सल्लागार लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांची संघटनेचे पदाधिकारी व कामगार प्रतिनिधींनी सदिच्छा भेट त्यांना दीपावलीच्या शुभेच्छा देत त्यांचे आभार मानले. यावेळी रामदास गोंधळी, सुनील पाटील, यासिम शेख, अनिल पावशे, जयराम जाधव, सुनील हरिश्चंद्रकर आदी उपस्थित होते. संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत यांनी याबद्दल बोलताना सांगितले कि, म्हणाले की, "कामगारांचे हक्क मिळवण्यासाठी संघटना सदैव तत्पर असते. या वर्षीही अनेक चर्चांनंतर कामगारांना योग्य तो बोनस मिळवून देण्यात आम्ही यशस्वी ठरलो आहोत. कामगार आणि कंपनी यांचे नाते घट्ट असले पाहिजे, कारण त्यामुळे कंपनी आणि कामगार यांचे भले होते. जय भारतीय जनरल कामगार संघटना कामगारांच्या हक्कासाठी लढत असते. त्यामुळे ती जबाबदारी घेऊन संघटना काम करत असते, असेही जितेंद्र घरत यांनी नमूद केले.

# "वाचन म्हणजे माणसाच्या प्रगतीचा श्वास आहे" - विजू कोकाटे सर

## स्वातंत्र्यवीर सावरकर वाचनालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**चिचोंडी पाटील (ता. अहिल्यानगर)**
**प्रतिनिधी -संतोष जाधव**

भारताचे महान शास्त्रज्ञ व माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त चिचोंडी पाटील येथील स्वातंत्र्यवीर सावरकर वाचनालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी आदर्श शिक्षक विजू भाऊ कोकाटे सर यांनी डॉ. कलाम यांच्या बालपणापासून ते राष्ट्रपतीपदापर्यंतचा प्रवास सांगताना "वाचन हे माणसाच्या प्रगतीचा श्वास आहे. जो वाचतो, तो सतत वाढत राहतो," असे प्रभावी विचार मांडले. त्यांनी कलाम यांच्या संघर्षमय जीवनातून विद्यार्थ्यांनी जिद्द, सातत्य आणि प्रामाणिकतेचा धडा घ्यावा, असे सांगितले.



नृसिंह माध्यमिक विद्यालय भातोडीचे मुख्याध्यापक प्रकाश ठोंबरे यांनी चिकाटीच्या बळावर डॉ. कलाम यांनी कसे यश संपादन केले यावर प्रेरणादायी भाषण केले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान चिचोंडी पाटील विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन संदीप कोकाटे यांनी भूषविले. त्यांनी तरुण पिढीने वाचनाची ओढ निर्माण करून पुस्तकांना आयुष्यात महत्त्वाचे स्थान द्यावे, असे आवाहन केले.प्रा. विजय विठ्ठल कोकाटे यांनी गावातील तरुणांनी वाचनालयातील पुस्तकांचा उपयोग स्वतःच्या प्रगतीसाठी करावा, असे सांगितले.

या प्रसंगी अहिल्यानगर जिल्हा ग्रंथालय व स्वातंत्र्यवीर सावरकर वाचनालयाच्या वतीने सर्वोत्तम वाचक म्हणून महादेव ठोंबरे व सागर कांकरिया यांचा प्रशस्तीपत्रक देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमासाठी शब्दगंध पुरस्कारप्राप्त साहित्यकार मारुती खडके, वाचनालय अध्यक्ष कल्याण ठोंबरे, ग्रंथपाल संतोष पवार, उद्योजक सुनील कोकाटे, काका कोकाटे, शाम दरेकर, अशोक काकडे, युवराज देवकर, चव्हाण साहेब आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रकाश ठोंबरे यांनी केले तर आभार विजू भाऊ कोकाटे यांनी मानले.

# शिक्षक म्हणजे सृजनशीलता व सकारात्मक ऊर्जेचा स्त्रोत - डॉ.हेमंत वैद्य

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी/सेलू शिवाजी पवार**

विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानत शिक्षकांनी त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न करावेत. विध्यार्थ्यांमध्ये शिक्षकांविषयी आदर असतो. विद्यार्थी हे अनुकरणीय असतात.नवनिर्मिती क्षमता व सृजनशीलता तसेच सकारात्मक दृष्टीकोन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यासाठी शिक्षकांनी सदैव प्रयत्नशील असावे असे प्रतिपादन भा. शि.प्र.संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य यांनी विवेकानंद विद्यालय सेलू आयोजित सत्रांत (१५ ऑक्टोंबर) बैठकीत बोलताना केले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी हरिभाऊ चौधरी,उपेंद्र बेल्लूरकर,करुणा कुलकर्णी,मु.अ.शंकर शितोळे यांची



व्यासपीठावर उपस्थिती होती.

डॉ.हेमंत वैद्य पुढे बोलताना म्हणाले की ,शाळेचा इतिहास हा शिक्षकांच्या त्याग,समर्पण यावर लिहिला जातो.आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आपण अध्यापनात करावा तसेच पालक संपर्क साधत विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवाव्यात.शाळेचा व समाजाची आंतरक्रिया घडवून आणावी. शिक्षकांनी कार्यकर्त्याची भूमिका निभवावी.मुलांमध्ये अभ्यासाची गोडी निर्माण करत अपेक्षित वर्तन बदल करावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

बैठकीच्या प्रारंभी विवेकानंद व माजी राष्ट्रपती,भारतरत्न डॉ.ए. पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.मूल्यमापन,स्पर्धा परीक्षा अहवाल, विविध विषय अहवाल,बालवाडी अहवाल यांचा या सत्राचा आलेख मांडण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन साळवे,प्रास्ताविक शंकर शितोळे,आभार करुणा कुलकर्णी यांनी मानले.बैठक यशस्वीतेसाठी शिक्षक,सेवक वर्ग यांनी प्रयत्न केले.

## तरुण नेतृत्वाचा उदय : डोंगरगाव गणात योगेश भोसले व राजेश भडांगे चर्चेत

**दैनिक युवक आधार**
**जनार्दन चव्हाण**
**प्रतिनिधी विंचूर /(ता. निफाड ) :** तालुक्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ आल्या असून, तरुणांमध्ये नव्या जोमाने राजकारणात उतरण्याची तयारी सुरू आहे. पारंपरिक नेत्यांच्या सावलीत वाढलेल्या तरुण पिढीने आता स्वतःचे नेतृत्व निर्माण करण्याचा निर्धार केला आहे.

या निवडणुकीत अनेक नव्या चेहऱ्यांची चर्चा रंगत असून, योगेश भोसले व राजेश भडांगे या तरुणांची नावे विशेषतः डोंगरगाव



गणात अग्रस्थानी दिसत आहेत. दोघेही सामाजिक कार्यातून घडलेले असून, जनतेत आपली वेगळी छाप निर्माण करण्यात ते यशस्वी झाले आहेत.

जनतेत पारंपरिक राजकारण्यांविषयी नाराजीचे वातावरण असताना, नव्या नेतृत्वाकडून परिवर्तनाची अपेक्षा व्यक्त होत आहे. तरुण वर्गाची राजकारणात वाढती भागीदारी पाहता, आगामी निवडणुकांमधून समाजकारणाला नवा वेग मिळण्याची चिन्हे आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतून नव्या चेहऱ्यांच्या माध्यमातून गावपातळीवरील राजकारणात ताजेपणा येईल, असा विश्वास मतदार व्यक्त करत आहेत.

## चोखाजी नाना सौंदर्य यांनी गटविकास अधिकारी यांची गाडी थांबवून घरकुलच्या बिलावर घेतल्या सह्या

**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना(अशोक ठोके)**

परतूर पंचायत समिती मध्ये गेल्या कित्येक दिवसांपासून रमाई आवास योजना,पीएम आवास योजना, मोदी आवास योजना इत्यादी योजनाच्या घरकुलच्या बिलावर गटविकास अधिकारी राजेश तांगडे यांच्या सह्या होत नवत्या त्यामुळे घरकुल लाभार्थी अतिशय परेशान होते, हि बाब वंचित बहुजन आघाडीचे ज्येष्ठ नेते चोखाजी नाना सौंदर्य यांच्या निदर्शनात



आणून दिली असता लागलीच चोखाजी नाना सौंदर्य यांनी गटविकास अधिकारी कार्यालय परतूर येथे येऊन गटविकास अधिकारी निघण्याच्या तयारीत असताना त्यांची गाडी थांबवून घरकुलच्या बिलावर सह्या घेतल्या.तरी देखील काही लाभार्थी सह्यांवाचून वंचित राहिलेले आहेत त्यांच्या देखील बिलावर दोन दिवसात सह्या देतो असे गटविकास अधिकारी यांनी सांगितले. ज्यांच्या बिलांवर सह्या झाल्या आहेत त्यांच्या बिलाचा FTO(Fund Transfer Order) लवकर करून गटविकास अधिकाऱ्याची DSC(Digital Signature Certificate) लाऊन लाभार्थ्यांच्या खात्यात लवकरात लवकर पैसे जमा करावेत असे चोखाजी नाना सौंदर्य यांनी कर्मचाऱ्यांना आवाहन केले आहे,

जर उर्वरित घरकुल लाभार्थ्यांच्या बिलावर सह्या लवकर झाल्या नाहीत तर आंदोलन छेडण्याचा इशारा चोखाजी नाना सौंदर्य यांनी दिला आहे. ऐन दिवाळीत घरकुलच्या बिलावर सह्या घेऊन दिल्या बद्दल घरकुल लाभार्थ्यांनी चोखाजी नाना सौंदर्य यांचे आभार मानले आहेत.

# सामाजिक जाणिवेचा आदर्श ठरला वाढदिवस!

## महादेव थोरात यांनी वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून विद्यार्थ्यांना टाय व बेल्टचे वाटप

**दैनिक युवा आधार**
**आष्टी प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे**

आष्टी तालुक्यातील अंभोरा येथील महादेव थोरात यांनी आपल्या ३५व्या वाढदिवसानिमित्त एक आगळीवेगळी सामाजिक वाट चोखाळली आहे. केक कापणे, बॅनरबाजी, फुगेबाजी अशा अनावश्यक खर्चाला फाटा देत त्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असा सामाजिक उपक्रम राबविला.

महादेव थोरात यांनी अंभोरा येथील जिल्हा परिषद शाळेतील सुमारे १५० विद्यार्थ्यांना टाय आणि बेल्टचे वाटप केले. "वाढदिवस साजरा करण्यापेक्षा तो खर्च जर शालेय विद्यार्थ्यांच्या



उपयोगी वस्तूंवर केला, तर त्यातून खरी समाधानाची अनुभूती मिळते" — अशी त्यांची विचारधारा आहे.

या उपक्रमास मुख्याध्यापक अशोक शिंदे सर, ज्येष्ठ कवी विवेक साळुंके सर, अण्णासाहेब घोडके सर, संतोष पवार सर, शिवाजी खुडे सर, अनामिका शिंदे मॅडम, पवार मॅडम आदी शिक्षकांचा सक्रिय सहभाग होता.

कार्यक्रमास अंभोरा पोलीस स्टेशनचा स्टाफ, तसेच बन्सी कारभारी खाकळ, इस्माईल पठाण, संतोष आमले, राजेश आटोळे, ऋषिकेश थोरात, राजदीप खाकळ, जमील पठाण, सोनाली काळे, लोचना खाकळ, शामल ओव्हाळ, कालिगा आमले आदी मान्यवर उपस्थित होते.महादेव थोरात यांच्या या सामाजिक व शैक्षणिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, त्यांच्या या कार्यातून समाजासमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे.

## चिखलपहेला येथे दीपावली, भाऊबीज व मंडई निमित्त एक डाव वाघिणीचा या नाटकाचे आयोजन 23 ऑक्टोबरला

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा -** तालुक्यातील पहेला येथून २ किलोमीटर अंतरावर असलेल्या चिखलपहेला येथे खास दीपावली ,भाऊबीज व मंडई निमित्त ग्रामीण बहुउद्देशीय सांस्कृतिक नाट्य कला मंडळ चिखलपहेला यांच्या सौजन्याने २३ ऑक्टोबर २०२५ ला रात्री ९ वाजता' एक डाव वाघिणीचा या नाटकाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या नाटकाचे उद्घाटन डॉ. राजेश वासनिक पशुसंवर्धन अधिकारी यांच्या हस्ते होईल .तर सर्व सहउद्घाटक म्हणून प्रा.डॉ. जयदेव देशमुख उपस्थित राहतील. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्रीधर शहारे माझी पोलीस उपनिरीक्षक राहतील. प्रमुख अतिथी म्हणून गौरीशंकर वासनिक, लुहास गोंडाने सरपंच वाकेश्वर, कविताताई उईके जिल्हा




परिषद अध्यक्षा, सुभाष आजबले, दयानंद नखाते,दीपक वानखेडे, पत्रकार संजीव भांबोरे, दिलीप मोहतुरे,भोजराज भोयर, काजल चवळे पंचायत समिती सदस्या, सीमाताई रामटेके पंचायत समिती सदस्या, लेमन मेश्राम, ग्रामसेवक शालिक लुटे, तलाठी सरोदे, व अन्य मान्यवर यावेळी प्रामुख्याने उपस्थित राहतील.

कार्यक्रमाच्या लाभ घेण्याचे आवाहन मंडळाचे अध्यक्ष मनोज शहारे, रुपेश शहारे ,,सचिव आनंद वासनिक, सहसचिव रंजीत धुळसे, कोषाध्यक्ष राजेश शहारे, मनोज जीवतोडे ,त्रिवेंद्र चाचणे,चेतन शहारे ,राधेश्याम नेवारे, शांतनु शहारे , कृष्णा कावळे ,अभिषेक शहारे, शैलेश सहारे ,कार्तिक शहारे, वैभव शहारे व मंडळातील सर्व सदस्यांनी केलेले आहे.

# राजीव गांधी महाविद्यालयाजवळ नगरपालिकेचे दुर्लक्ष

## पाणी साचल्याने नागरिक, विद्यार्थी आणि वाहनचालक त्रस्त

**दैनिक युवक आधार**
**मुदखेड (प्रतिनिधी) योगेश चौदंते**

राजीव गांधी महाविद्यालयाजवळील मुख्य रस्त्यावर गेल्या अनेक दिवसांपासून पाणी साचत असून नागरिक, विद्यार्थी आणि वाहनचालक यांचे हाल होत आहेत. नाली तुंबल्यामुळे सांडपाणी रस्त्यावर वाहत असून रस्ता चिखलमय झाला आहे. त्यामुळे परिसरात अस्वच्छता आणि दुर्गंधीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दररोज या रस्त्यावरून शेकडो विद्यार्थी आणि नागरिक प्रवास करतात. पाण्याचा निचरा न झाल्यामुळे रस्ता घसरडा झाला असून अपघाताचा धोका वाढला आहे. काही ठिकाणी रस्त्यावरील विटा व खडी उखडल्याने खड्डे तयार झाले आहेत.



स्थानिक नागरिकांनी नगरपालिकेकडे अनेक वेळा तक्रारी करूनही अद्याप दुरुस्तीचे कोणतेही काम हाती घेण्यात आलेले नाही. पाण्यामुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

"दरवर्षी अशीच परिस्थिती निर्माण होते. नगरपालिका अधिकारी फक्त पाहणी करून जातात, पण काहीही काम होत नाही," असे नागरिकांनी सांगितले. वाहनचालकांचे म्हणणे आहे की, "रस्त्यावरील चिखल आणि पाण्यामुळे वाहनावर ताबा ठेवणे कठीण जाते. थोडीशी चूक झाली तरी अपघात होऊ शकतो."

नागरिकांनी नगरपालिकेकडे तात्काळ उपाययोजना करून नाल्याची स्वच्छता, रस्त्याची दुरुस्ती आणि कायमस्वरूपी निचरा व्यवस्था उभारण्याची मागणी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे

राजीव गांधी महाविद्यालयाजवळील मुख्य रस्त्यावर साचलेले सांडपाणी — नागरिक व वाहनचालकांना होणारा त्रास स्पष्ट दिसतो.

# वाकद जिल्हा परिषद सर्कल करिता लखन भैया ठाकूर उतरणार यावेळेस रिंगणात

**दैनिक युवक आधार**
**रिसोड. प्रतिनिधी रणजीत ठाकुर**

वाशिम जिल्हा परिषद पंचायत समितीचे निवडणूक आरक्षण मागील दोन-तीन दिवसापूर्वीच जाहीर झाले अनेक सर्कल मध्ये इच्छुकांची मोर्चे बांधणी सुरू झाली जिल्ह्यातील राजकीय राजधानी समजल्या जाणाऱ्या रिसोड तालुक्यांमध्ये त्यातल्या त्यात वाकद जिल्हा परिषद यावेळेस खुला आरक्षण वर्ग सुटल्याने अनेक राजकारणी दिंगत आपलं नशीब आजमावण्याच्या तयारीत करिता दिसत आहे. त्यामध्ये वाशिम. जिल्ह्यामध्ये प्रसिद्ध व्यक्तिमत्व असलेले भाजपाचे नेते भाजपाचे माजी वाशिम जिल्हा उपाध्यक्ष तथा सध्याचे भाजपा उत्तर भारतीय महाराष्ट्र प्रदेश सचिव लखन सिंह ठाकुर यांनी सुद्धा प्रथमच वाकद. सर्कल मध्ये निवडणूक लढविण्यात सत्संग बांधला असून लखन सिंग ठाकूर हे नेहमीच रिसोड तालुक्यातील शेतकरी बांधवांच्या प्रश्नाकरिता शासन दरबारी आपल्या आपल्या परीने निवेदन देऊन पाठपुरावा करून मंत्रालयीन पाठपुरावा करून शेतकऱ्याला मदत



करण्याच्या प्रयत्नात असतात त्यांच्याकडे अनेक शेतकरी विमाधारक असो किंवा कृषी विभाग तहसील कार्यालयाचे काम घेऊन आल्यानंतर त्यांना योग्य मार्गदर्शन करून त्याची दखल घेण्याकरिता त्या त्या खात्याच्या अधिकाऱ्याला फोन लावत असतात त्याचप्रमाणे 2014 च्या तात्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणीस साहेब यांच्या कार्याला भारावून जाऊन त्यांनी मी पाहिलेले मुख्यमंत्री नावाचे पुस्तक स्वस्त लिखित करून मुख्यमंत्री मंत्रालय जाऊन सर्व मंत्र्याच्या उपस्थितीमध्ये. प्रकाशन करून प्रकाशित केले होते तेव्हापासून लखन भैय्या हे प्रकाश झोतात आले तेव्हापासून त्यांनी जनतेचे काम करण्यावर भर दिला असून वैनगंगा पैनगंगा नदी जोड प्रकल्पामध्ये वाशिम जिल्ह्याचा नाव समाविष्ट होण्याकरिता आपल्या राज्याचे तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कौशारी. साहेबांकडे वारंवार पाठपुरावा करून शासन स्तरावर प्रयत्न करून वैनगंगा पैनगंगा नदीजोड प्रकल्पामध्ये वाशिम जिल्ह्याचा सुद्धा समावेश करून घेण्यात आला. रिसोड तालुक्यातील पळसखेडा लघु पाटबंधारे विभागाचा प्रकल्प 2014 पर्यंत मागील बारा वर्षापासून बंद अवस्थेत होता तात्कालीन जलसंपदा मंत्री गिरीश महाजन साहेब यांनी लखन सिंह ठाकुर यांच्या निवासस्थानी भेट दिली असता त्यांनी आमच्या रिसोड तालुक्यामधील हा प्रकल्प अनेक वर्षापासून बंद आहे त्यामुळे सिंचनाचा खूप मोठा प्रश्न निर्माण होत आहे रिसोड तालुका हा सिंचनाच्या दृष्टीने अत्यंत मागे असलेला असल्याकारणाने हा प्रकल्प पूर्णतः न्यायला पाहिजे याकरिता जलसंपदा मंत्री गिरीश महाजन साहेब यांच्याकडे पाठपुरावा करून सध्याच्या स्थितीत पळसखेडा धरण पूर्णत्वास गेले त्यासोबतच रिसोड तालुका पैनगंगा नदीवर सिंचनाच्या दृष्टीने बॅरेजेस व्हावा जेणेकरून रिसोड तालुक्यातील वाकद ,धोडप बालखेडा वाडी वाकद एकलासपूर पिंपरखेडा सरपखेडा गोहगाव या पैनगंगा नदीवरच्या काठावर असलेल्या सर्व आजूबाजूच्या जमिनीला व शेतकऱ्यांना कायम सिंचनाची सोय व्हावी म्हणून मागील अनेक वर्षापासून शासन दरबारी छोट्या बंधाऱ्याचे रूपांतर मोठ्या बॅरेजेस मध्ये होण्या करिता शासन दरबारी सारखा पाठपुरावा चालू आहे

थोडक्यात मुख्यमंत्री साहेब त्यासोबतच अनेक विभागाचे अनेक मंत्र्यांसोबत जाऊन भेटून पाठपुरावा करत असतात, त्यांची मंत्रालयाने पाठपुरावा करण्याची ख्याती सर्वपरिचित असल्याकारणाने यावेळेस ते वाकद जिल्हा परिषद सर्कल मध्ये जिल्हा परिषद सदस्या करिता निवडणूक लढू शकतात अशी चर्चा वाकद.सर्कल सह रिसोड तालुक्यात जोर धरत आहे

# सणसर पंचक्रोशीतील मुलांसाठी किल्ले बनवण्याचं स्पर्धेचे आयोजन

## शिवतेज शिवजयंती मंडळ यांचा पुढाकार

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

दिवाळी सुट्टीत शाळकरी मुलांना वेध लागतात ते किल्ले बनविण्यांचा मात्र,यांचा पुर्ण अनुभव अथवा प्रशिक्षण न घेतल्यामुळे आपल्याला हवे तसा किल्ला बनविता येता यावा म्हणून सणसर येथील शिवप्रेमी युवक शिवतेज शिवजयंती मंडळामार्फत आयोजित करण्यात आले असून मराठी मुलां मुलींसाठी किल्ले व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या सणसर भागातील बहुसंख्येने शाळकरी मुले उपस्थित असल्याने ही स्पर्धा आयोजित केली आहे. किल्ला आपणांस कसे बनविता येईल अथवा या किल्यांची भौगोलीक स्थिती बुरुज तोफखाना भुयारी मार्ग तलाव विहीर सैनिक या सर्व बाबीचा समावेश किल्यामध्ये असणे गरजेचे आहे विशेष म्हणजे किल्ला बांधत असतांना आपण कोणता किल्ला बांधत आहोत




यांचा आभ्यास करुन तो बनविला पाहिजे.यासाठी येथे आलेल्या सर्व किल्ले प्रेमी यांनी बनवलेला किल्यांची प्रतिकृती तयार करुन आपण किल्ला बनवावा असे अवाहन या शिवतेज मंडळ सणसरच्या माध्यमातून अध्यक्ष राहुल जगताप व उपाध्यक्ष कुलदीप निंबाळकर यांनी केले आले.

यावेळी मुलांना मातीचा किल्ला बांधणा-यास रोख पारितोषिक व ट्रॉफी देऊन सन्मानित केले जाईल ही स्पर्धा ग्रामपंचायत सणसर व परिसरातील मुले व मुलींनी भाग घ्यावा असे मत मंडळाच्या वतीने राहूल जगताप कुलदीप निंबाळकर सोमनाथ राजेभोसले विक्रम भैय्या निंबाळकर सुनील निंबाळकर किरण गायकवाड अतुल घोडे निखिल भोसले गणेश भोसले अमोल पाठक यांनी केले आहे.

या किल्यांचे परिक्षण शिवतेज शिवजयंती मंडळ शिवतेज चौक सणसर यांच्या माध्यमातून करण्यांत येणार आहे.

# काळेगाव पंचायत समिती गणातून पक्षाने मला संधी दिल्यास भारतीय जनता पार्टीचा झेंडा फडकू :- ज्ञानेश्वर पवार

**दैनिक युवक आधार**
**जाफराबाद टेंभूर्णी प्रतिनिधी -अनिल ससाने**

जाफराबाद जिल्हा जालना येथे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकाचे आरक्षण नुकतेच जाहीर झाले असताना काळेगाव पंचायत समिती गणातून पापळ येथील भारतीय जनता पार्टीचे एकनिष्ठ कार्यकर्ते ज्ञानेश्वर गुलाबराव पवार यांनी त्यांची काळेगाव पंचायत समिती गणातून निवडणूक लढण्याची इच्छुकता दर्शविली आहे व ते म्हणाले की काळेगाव पंचायत समिती गणामध्ये विविध विकास कामे या क्षेत्राचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी मी तत्पर असून भारतीय जनता पार्टीने मला काळेगाव पंचायत समिती गणातून उमेदवारी दिली तर जनतेचा विश्वासावर आपण मोठ्या मताने निवडून येऊन काळेगाव पंचायत समिती गणाचा सर्वांगीण विकास करू पवार दैनिक युवक आधारच्या प्रतिनिधींशी बोलतानी म्हणाले की मी प्रत्येकाच्या सुखा दुःखात सहभागी होतो तळागाळातील घटकापर्यंत माझी नाळ जुळलेली असून सर्वांच्या परिचयाचा आहे तसेच शेतकरी कष्टकरी वयस्कर विद्यार्थी कामगार तसेच महिला यांच्या न्याय हक्कासाठी मी लढत



असून मी नागरिकांच्या अनेक समस्या सोडवलेल्या असल्याने माझ्यावर या सर्कलचा प्रचंड विश्वास असून भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ नेत्याकडे माझी नोंद आहे माननीय केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे व जाफराबाद भोकरदन मतदार संघाचे आमदार तथा पंचायतराज सदस्य संतोष पाटील दानवे यांनी मला काळेगाव पंचायत समिती गणातून निवडणूक लढविण्याची संधी दिली तर नक्कीच काळेगाव पंचायत समिती गणाचा विकास केल्याशिवाय राहणार नाही

# अस्मानी संकट आणि शेतकरी : मातीशी नातं ठेवणारा जिवंत देवदूत

शेतकरी हा आपल्या देशाचा कणा आहे, परंतु आज या कण्यालाच अस्मानी संकटाने वाकवून ठेवले आहे. निसर्गाचा कोप, हवामानातील अनिश्चितता, पावसाची बेभरवशाची चाल आणि त्यातून निर्माण झालेली आर्थिक बिकट परिस्थिती या सगळ्यामुळे शेतकऱ्याचे आयुष्य जणू एका न संपणाऱ्या संघर्षात अडकले आहे. एकेकाळी 'आषाढात पेरणी आणि श्रावणात हिरवळ' ही म्हण खरी ठरत होती, पण आता हवामान बदलाच्या सावटाखाली ही म्हण फिकट पडली आहे. पाऊस वेळेवर न पडणे, अचानक अतिवृष्टी होणे, गारपिटीचा तडाखा बसणे या अस्मानी संकटांनी शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. कधी दुष्काळाचे सावट, तर कधी पूरस्थिती अशा दोन्ही टोकांमध्ये शेतकरी झुलत आहे.

माणूस शहरात छत्री घेऊन पावसापासून वाचतो, पण शेतकरी मात्र त्या पावसाची वाट बघत असतो. अस्मानी संकट म्हणजे फक्त आकाशातून कोसळणारा पाऊस नव्हे; ते म्हणजे शेतकऱ्याच्या मनावर कोसळणारी काळजी, त्याच्या भविष्यावर आलेलं सावट आणि त्याच्या जगण्याचा तुटलेला धागा. निसर्गाचा कोप, आशेचा अपघात कधी दुष्काळाने भूमी फाटते, तर कधी अतिवृष्टीने पिकं वाहून जातात. गारपीट, वादळ, पूर या प्रत्येक घटनेसोबत शेतकऱ्याचे हृदयही मोडते. त्याच्या आयुष्यातील प्रत्येक ऋतू ही परीक्षा ठरते.



पेरणीच्या वेळी आशा असते, पण कापणीच्या वेळी नेहमीच भीती. कारण निसर्गाचा एक कोप आणि वर्षभराच्या घामाचे स्वप्न एक क्षणात उद्ध्वस्त! शेतकरी घामाचं सोनं करतो पण त्याला मोबदला मातीचा मिळतो. शेतकरी रात्रंदिवस कष्ट करतो, भूमीला जीव देतो, पण त्याला त्याचा योग्य मोबदला मिळत नाही. तो जमिनीवर घाम गाळतो, जीव ओततो, पण त्याला मिळतो फक्त तोट्याचा हिशेब. पिक बुडालं तर विमा कंपन्या हात झटकतात, नुकसान भरपाई मिळेपर्यंत कर्जाचे ओझे वाढते. एकीकडे बँकेचे नोटिसांचे सावट, तर दुसरीकडे घरच्यांच्या पोटाची जबाबदारी या द्वंद्वात शेतकरी तुटत चालला आहे. पिकांचं दर घसरतो, विमा मिळत नाही आणि मग तोच शेतकरी, जो अन्नदाता आहे, तो स्वतःचं अन्न मिळवण्यासाठी झगडतो. हे केवळ अन्याय नाही, ही व्यवस्थेची संवेदनशून्यता आहे.

शासन अनेक योजना जाहीर करते विमा योजना, अनुदाने, कर्जमाफी, परंतु त्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याआधीच फाईल्सच्या दलदलीत अडकतात. मदतीचा लाभ मिळेपर्यंत शेतकऱ्याची आशा कोरडी पडते. शासनाकडून मिळणारी मदत ही 'सहानुभूती' नसून 'न्याय' असायला हवी. प्रत्येक वेळी नवनवी योजना, घोषणा आणि मदतीच्या आश्वासनांचा पाऊस पडतो. पण त्या थेंबांमध्ये शेतकऱ्याला आधार नाही, तर फसवणूक असते. शासनाच्या घोषणा आशेची पतंग की दिखाऊ फुगा! नुकसानीचे पंचनामे, कागदपत्रं, अर्ज या सगळ्या प्रक्रियेत शेतकऱ्याचं आयुष्य फाईलमध्ये अडकून राहतं. त्याला हवी आहे तत्काळ मदत, खऱ्या अर्थाने न्याय आणि मानवी संवेदना. अस्मानी संकटाने कितीही तडाखे दिले, तरी शेतकरी पुन्हा उभा राहतो. त्याच्या हातात माती असते, पण मनात विश्वास असतो "पाऊस येईल, पिकं येतील." ही आशा म्हणजे भारतीय कृषी संस्कृतीचं प्रतीक आहे. परंतु या आशेचा गैरफायदा घेणं थांबवलं पाहिजे. निसर्गाने कितीही तडाखे दिले, तरी शेतकरी पुन्हा मातीशी नातं जोडतो. त्याच्या अंगावर कर्जाचं ओझं असतं, तरीही तो नव्या पिकाचं स्वप्न पाहतो. कारण त्याला माहीत आहे. मातीचा वास म्हणजे जीवन आणि आशा म्हणजेच शेती तरीही उभा राहणारा शेतकरीच. आपण शहरात अन्न खातो पण त्या अन्नामागे कोणाचा घाम आहे हे विसरतो. शेतकरी केवळ उत्पादक नाही, तो जीवनदाता आहे. त्याचं जगणं सुरक्षित असलं, तर देशाचं उद्याचंही सुरक्षित राहील. म्हणूनच समाजाने आणि शासनाने मिळून या अस्मानी संकटाला मानवी संवेदनांनी उत्तर द्यायला हवं.

हवामानाच्या बदलत्या परिस्थितीनुसार शाश्वत शेती पद्धती राबविणे आवश्यक आहे. विमा यंत्रणेतील सुधारणा व्हावी व नुकसानीचे वास्तव मूल्यांकन करून तत्काळ मदत मिळावी. कृषी शिक्षण आणि प्रशिक्षण: नवीन तंत्रज्ञान, जलसंवर्धन, आणि जैविक शेती यावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे. बाजारभाव स्थिरीकरण होऊन मध्यस्थांच्या ऐवजी थेट ग्राहकांपर्यंत शेतकऱ्याचे उत्पादन पोहोचावे. शेतकरी रात्रंदिवस मेहनत करून भूमीला फुलवतो, पण उत्पादन वाढलं तरी उत्पन्न वाढत नाही. पिकांच्या दरातील अनिश्चितता, बाजारपेठेतील मध्यस्थांची लूट आणि विमा कंपन्यांच्या कारभारातील त्रुटी या सगळ्यांनी शेतकरी आर्थिकदृष्ट्या अधिकच कमकुवत झाला आहे. अलिकडच्या काही वर्षांत पावसाच्या पॅटर्नमध्ये मोठा बदल झालेला दिसतो. कधी पाऊस उशिरा येतो, तर कधी काही दिवसांतच एवढा कोसळतो की संपूर्ण हंगामाची समीकरणे बिघडतात. त्यातच गारपीट आणि वादळासारख्या आपत्तीमुळे शेतकऱ्याच्या मेहनतीचा सगळा मातीमोल होतो. फक्त तात्पुरती मदत पुरेशी ठरणार नाही. हवामान बदल लक्षात घेऊन शेतीला वैज्ञानिक व तंत्रज्ञानाधारित स्वरूप देणे गरजेचे आहे. जलसंधारण, पाण्याचा तर्कशुद्ध वापर, हवामाननिष्ठ शेती पद्धती आणि थेट ग्राहकांपर्यंत विक्री यांसारख्या उपायांवर भर दिला पाहिजे. विमा योजनांना सुलभ आणि पारदर्शक बनविणे अत्यावश्यक आहे. फक्त तात्पुरती मदत पुरेशी ठरणार नाही. हवामान बदल लक्षात घेऊन शेतीला वैज्ञानिक व तंत्रज्ञानाधारित स्वरूप देणे गरजेचे आहे. जलसंधारण, पाण्याचा तर्कशुद्ध वापर, हवामाननिष्ठ शेती पद्धती, आणि थेट ग्राहकांपर्यंत विक्री यांसारख्या उपायांवर भर दिला पाहिजे. विमा योजनांना सुलभ आणि पारदर्शक बनविणे अत्यावश्यक आहे.

अस्मानी संकट हे थांबवता येणार नाही, पण त्याचा परिणाम कमी करता येऊ शकतो. यासाठी शासन, समाज आणि शेतकरी तिघांनीही एकत्र येऊन उपाययोजना राबवायला हव्यात. शेतकऱ्याच्या घामाने या भूमीला अन्न मिळतं, म्हणूनच त्याच्या डोळ्यातील अश्रू पुसणं ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. आकाश काळं झालं तरी पेरणी थांबत नाही, कारण शेतकरी आशेचा पेरणीवाला असतो. त्याच्या डोळ्यातली आस, त्याच्या मातीची ओल हाच आपल्या देशाचा खरा आत्मा आहे. तर चला, शेतकऱ्याच्या संघर्षाला सलाम करू या. कारण तो फक्त अन्नदाता नाही तर तो या भूमीचा श्वास आहे!

**- प्रवीण बागडे**

# कुलदीपक शेंडे नगराध्यक्षपदासाठी इच्छुक ; युवा, उच्चशिक्षित नेतृत्वास खोपोलीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## शिवसेना पक्ष भैरवी कार्यालयात खोपोलीकरांच्या भेटीगाठीला ओघ

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी ,खोपोली**

माजी नगराध्यक्ष रामदास शेंडे यांच्या अनेक वर्षांच्या कारकिर्दीत शहराच्या सर्वांगिण विकासासाठी विविध विकास कामे झाली . कुलदेवीं भैरवी मातेची कृपा दृष्टी शेंडे यांच्या परिवारावर असल्याने त्यांनी आपल्या जीवन प्रवास करताना अध्यात्मिक सांगड ठेवत भक्तीतून शक्ती प्राप्त करीत लोकसेवा व्हावी या उद्देशाने राजकारणातून सकारात्मक समाजकारण केले ,स्वतःच्या कुटुंबियांसारखे शहरावर हि विशेष प्रेम करीत आपल्या कर्तुत्वाचा ठसा कायम ठेवण्यात यशस्वी राहिले .त्यांच्या याच लोकसेवेचा वारसा त्यांचे जेष्ठ पुत्र कुलदिपक शेंडे यांनी पुढे चालवत नगरसेवक ते उपनगराध्यक्ष असा यशस्वी राजकीय ,सामाजिक प्रवास करत आपल्या बुद्धी कौशल्याने नियोजन बद्ध कारभार केला. त्यामुळे त्यांना नगरपरिषद प्रशासन कारभाराचा चांगलाच दांडगा अनुभव आहे . आगामी निवडणूक लढताना महायुती मधील शिवसेना पक्षाचे ते संभाव्य इच्छुक उमेदवार असून जनतेत त्यांच्या नावाची चर्चा जोरधरताना दिसत आहे .त्यांच्या निवासस्थानी असलेल्या शिवसेना पक्षाच्या भैरवी कार्यालयाच्या ठिकाणी विविध पक्ष संघटनेतील व शहरातील विविध भागातील नागरिक त्यांच्या भेटीगाठीसाठी येत आहे हा ओघ पाहता हि निवडणूक जनतेने त्यांच्या नेतृत्वाखाली स्वखुशीने मनावर घेतलेली दिसत आहे . आगामी काळात शहराचे




अनेक निर्णय व होणाऱ्या निवडणुकीच्या दृष्टिकोनतून त्यांना मिळणारा मोठा प्रतिसाद पाहता, शिवसेना पक्षश्रेष्ठींना कुलदिपक शेंडे यांचे नाव निश्चित करण्यासाठी सहज जाणार आहे. विविध सामाजिक उपक्रमातून त्यांच्या होत असलेल्या भेटीगाठीत सर्व समाज घटक दिसत असून त्यांच्या कार्यपद्धती वरील प्रभाव अनेकांना माजी नगराध्यक्ष रामदास शेंडे यांची आठवण करून देत आहे . शांत,संयमी,दानशूर असे लोक नेतृत्व अनेक वर्ष राजकारणाशी दूर असलेले, पण प्रत्येक शहराच्या सार्वजनिक कार्यात सहभाग घेणारे माजी नगराध्यक्ष रामदास शेंडे यांनी नेहमी युवकांनी पुढे यावे व शहराचे नेतृत्व करावे यासाठी अनेक व्यासपीठावरून आव्हान केलेले पाहायला मिळाले आहे . लोकशाहीत सर्वांना संधी मिळावी, शहराचे हित व्हावे यासाठी त्यांनी राजकारणासोबत उद्योग, व्यवसाय ,शैक्षणिक ,सामाजिक संस्थेच्या कार्यात अनेक तरुणांना सोबत घेत, सामाजिक बांधिलकी जपली आहे. आजही अनेक युवक त्यांना स्मरणात ठेवत त्यांच्या पावलावर पाऊल ठेवणारे कुलदीपक शेंडे यांच्या निवडणूक नियोजनात स्वखुशीने सहभागी होत आहे .

मूलभूत सुविधांच्या पुढे जाऊन आधुनिक शहराला बनविण्यासाठी कुलदिपक शेंडे यांची असलेली इच्छाशक्ती व राजकीय महत्वकांक्षा पाहता येणाऱ्या काळात नगराध्यक्ष पदाचा उमेदवार ते विद्यमान नगराध्यक्ष हा त्यांचा प्रवास अनुभवण्यासाठी अनेक खोपोलीकरांच्या नजरा वाट पाहत असल्याचे बोलले जात आहे. शहरातील अनेक प्रभागातून घेतलेला आढावा पाहता शिवसेना पक्ष नगराध्यक्ष पदासाठी प्रमुख दावेदार ठरेल असे दिसत आहे ,तर दुसरीकडे राज्य व देशातील सर्वात मोठा पक्ष भारतीय जनता पार्टी खोपोलीच्या निवडणूकित कुठला निर्णय घेईल , व सत्ता यावी म्हणून कोणाशी युती करेल हे ही शिवसेना पक्षासाठी महत्वाचा निर्णय असेल .

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा शिवसेनेचा प्रमुख प्रतिस्पर्धी व विरोधी असून त्यांची लढाई पुढील काळात कोणाशी होईल व कुठली समीकरणे जुळवावी लागतील याकडे कुलदीपक शेंडे व खोपोली शहर शिवसेनेचे पक्ष नेतृत्व नजर ठेवून आहेत.

# पनवेल महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त ३२ हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान जाहीर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल,वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेतील विविध विभागांमध्ये कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना यंदाच्या दिवाळी सणानिमित्त आनंदाची बातमी मिळाली आहे. महापालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना ३२ हजार रुपये सानुग्रह अनुदान जाहीर केले आहे. याशिवाय प्राथमिक शिक्षक, एनयुएलएम आणि पीएमएवाय योजनेअंतर्गतच्या अधिकाऱ्यांना १० हजार रुपये, तर परिश्रमिक अधिकारी, एनयुएचएम कर्मचारी, आशा वर्कर आणि गट प्रवर्तकांना ७ हजार रुपये अनुदान देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे महापालिकेतील एकूण १,३२६ कर्मचाऱ्यांना थेट लाभ होणार असून, सणासुदीच्या काळात त्यांच्या आर्थिक मदतीला हातभार लागणार आहे. महापालिका प्रशासनाने हा निर्णय कर्मचाऱ्यांच्या मनोबल वाढवण्यासाठी आणि त्यांच्या सेवेला प्रोत्साहन देण्यासाठी घेतला आहे. आयुक्त चितळे यांनी सांगितले की, "दिवाळी हा सण आनंदाचा असतो आणि कर्मचाऱ्यांच्या मेहनतीला सन्मान देणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. हे अनुदान महापालिकेच्या आस्थापनेवरील सर्व स्तरांतील कर्मचाऱ्यांना मिळेल, जेणेकरून ते सण साजरा करताना आर्थिक ताण कमी होईल."अनुदानाचे वितरण खालीलप्रमाणे :अधिकारी व कर्मचारी (महापालिका आस्थापना): ३२,००० रुपये

प्राथमिक शिक्षक, एनयुएलएम व पीएमएवाय अधिकारी: १०,००० रुपये

परिश्रमिक अधिकारी, एनयुएचएम कर्मचारी: ७,००० रुपये

आशा वर्कर व गट प्रवर्तक: ७,००० रुपये

हे अनुदान लवकरच कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येणार असून, यासाठी महापालिकेच्या अर्थ विभागाकडून आवश्यक तजवीज करण्यात आली आहे. कर्मचारी संघटनांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, तो सणाच्या पार्श्वभूमीवर योग्य असल्याचे मत व्यक्त केले आहे.पनवेल महानगरपालिका गेल्या काही वर्षांपासून कर्मचारी कल्याणावर भर देत असून, असे उपक्रम शहराच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजवतात

# सर्वांची मने जिंकणारे एपीआय भास्करराव शिंदे साहेब — कर्तव्यनिष्ठ, संवेदनशील व लोकाभिमुख अधिकारी!

**दैनिक युवक आधार**
**जनार्दन चव्हाण**

**विंचूर, प्रतिनिधी :** पोलीस दलात कठोरता, शिस्त आणि कायद्याची अंमलबजावणी हे घटक जसे आवश्यक असतात, तसेच जनतेशी संवेदनशीलतेने वागणे हे देखील तितकेच महत्त्वाचे असते. या दोन्ही गुणांचा सुरेख संगम म्हणजे सहायक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे साहेब.

शिंदे साहेब हे केवळ पोलिस अधिकारी नसून जनतेच्या मनात स्थान मिळवणारे, सहृदय व समजूतदार अधिकारी म्हणून ओळखले जातात. परिस्थिती कितीही कठीण असो — गुन्हेगारी तपास असो, सामाजिक तणावाचा प्रसंग असो किंवा नागरिकांच्या



तक्रारींचे निराकरण असो — ते नेहमी शांतपणे, संयमाने आणि न्याय्य मार्गाने तोडगा काढतात.

त्यांच्या कामाची खासियत म्हणजे "माणुसकीतून केलेले पोलीसिंग". नागरिकांशी वागताना त्यांनी दाखवलेली नम्रता आणि सहानुभूतीमुळे सामान्य लोकदेखील

**कर्तव्यनिष्ठा, माणुसकी आणि सौजन्य यांचा उत्तम संगम म्हणजेच एपीआय भास्करराव शिंदे साहेब — "जनतेच्या मनातील अधिकारी!"**

त्यांना "आपले अधिकारी" म्हणून मानतात. गुन्हेगारांविरुद्ध कठोर भूमिका घेतानाच समाजातील चांगुलपणा जपण्याची जबाबदारी ते तितक्याच तत्परतेने पार पाडतात. गावोगावच्या नागरिकांशी संवाद साधणे, तरुणांना गुन्हेगारीपासून दूर ठेवण्यासाठी मार्गदर्शन करणे, सामाजिक कार्यक्रमांत सहभाग घेणे अशा अनेक उपक्रमांत ते पुढाकार घेतात. त्यामुळे समाजात त्यांची छबी "कठोर पण हृदयस्पर्शी" अशी निर्माण झाली आहे. सहकाऱ्यांमध्येही शिंदे साहेबांचा विशेष सन्मान आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली काम करणारे पोलीस कर्मचारी नेहमी सांगतात — "साहेब नेहमी मार्गदर्शकासारखे वागतात; रागाने नव्हे तर आदराने आदेश देतात."

समाजातील शांतता, सुव्यवस्था आणि सौहार्द राखण्यासाठी सतत प्रयत्नशील असणाऱ्या सहायक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे साहेबांचे कार्य हे खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आहे. त्यांनी जपलेली लोकसंपर्काची ही पद्धत आजच्या पोलिसिंगसाठी आदर्श ठरावी अशी अपेक्षा नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# पवन जाधव यांची संभाजी ब्रिगेडच्या तालुका उपाध्यक्षपदी निवड

## तालुकाध्यक्ष रुपेश पाटील बाजड यांच्या नेतृत्वात नियुक्तीपत्र वितरण

**दैनिक युवक आधार**
**रिसोड (प्रतिनिधी) – रणजितसिह. ठाकूर.**

सळसळत्या रक्ताचा धगधगता अंगार अहद ऑस्ट्रेलिया तहत कॅनडा अवघा मुलुख आपला म्हणून ओळखली जाणारी संभाजी ब्रिगेड या सामाजिक संघटनेच्या तालुका उपाध्यक्षपदी पवन जाधव (रा. जांब, ता. रिसोड) यांची निवड करण्यात आली आहे.

या प्रसंगी तालुकाध्यक्ष रुपेश पाटील बाजड यांच्या नेतृत्वाखाली पवन जाधव यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अर्जुन पाटील खरात, जिल्हा कार्याध्यक्ष विनोद



पाटील खडसे, जिल्हा उपाध्यक्ष विनोद पाटील बोडखे, दीपक पाटील शेवाळे, तसेच तालुका समन्वयक शेख अन्सार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

या नियुक्तीमुळे संघटनेला नवचैतन्य लाभणार असून, नव्या जबाबदारीसाठी पवन जाधव यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

नियुक्तीबाबत बोलताना पवन जाधव म्हणाले,"संभाजी ब्रिगेडच्या तालुकाध्यक्ष रुपेश पाटील बाजड यांच्या नेतृत्वात मला दिलेली ही जबाबदारी मी नम्रतेने स्वीकारतो.

घराघरांपर्यंत संभाजी ब्रिगेडचे कार्य पोहोचवण्याचे आणि समाजातील तरुणांना या संघटनेशी जोडण्याचे काम मी प्रामाणिकपणे करणार आहे."

या वेळी तालुकाध्यक्ष रुपेश पाटील बाजड यांनी सांगितले की,"संभाजी ब्रिगेड ही एक सामाजिक चळवळ असून, समाजकार्यात रस असलेले तरुण या संघटनेत सहभागी होऊन सामाजिक बांधिलकी जोपासावी."

# ग्रामीण प्रतिभेचा राज्यभर गौरव!"

## कवी शैलेश शिवाजीराव गायकवाड यांना 'अभिजात काव्य रसिक' राज्यस्तरीय सन्मानाने गौरवीत

**दैनिक युवक आधार**
**जनार्दन चव्हाण विंचूत प्रतिनिधी –**

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोजी अभिजात मराठी साहित्य सेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय 'काव्यरसग्रहण स्पर्धेत' राज्यभरातील अनेक मान्यवर कवी व लेखकांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत आपल्या ग्रामीण भागातील उदयोन्मुख कवी शैलेश शिवाजीराव गायकवाड यांनी आपल्या प्रभावी सादरीकरणाने परीक्षकांची मने जिंकत 'अभिजात काव्य रसिक'



या राज्यस्तरीय सन्मानाने गौरव प्राप्त केला.

या विशेष सन्मानाबद्दल कवी गायकवाड यांनी अभिजात मराठी साहित्य सेवा संघाचे अध्यक्ष स्वप्निल पाटील सर, तसेच त्यांच्या सहकाऱ्यांपैकी श्री. विवेक शेळके सर यांचे मनःपूर्वक आभार मानले.

शैलेश शिवाजीराव गायकवाड हे व्यावसायिक असून, त्यांना बालपणापासूनच वाचन व लेखनाची प्रखर आवड आहे. त्यांनी आजपर्यंत मराठी साहित्य क्षेत्रात ५१८ अभंग आणि सुमारे ६०० कविता लिहिलेल्या आहेत. याशिवाय अनेक लघुकथा, सांस्कृतिक लेख आणि शालेय जीवनातील प्रेरणादायी लेखन त्यांनी केले आहे.

आपल्या साहित्यिक प्रवासाचे श्रेय देताना ते भावनिक होत सांगतात की, "माझ्या शालेय जीवनात मराठी साहित्याची आवड निर्माण करण्याचे श्रेय शेटे सर, आहेर सर, पिटी पवार सर आणि पाटील सर यांना जाते. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयानेच मला लेखनाचा आत्मविश्वास दिला."

कवी गायकवाड यांच्या या सन्मानाने ग्रामीण भागातील साहित्यप्रेमींमध्ये अभिमानाची भावना दाटून आली आहे. मराठी साहित्याची नाळ ग्रामीण मातीत खोलवर रुजलेली असल्याचे या यशातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मेंडका येथे दिवाळी अभ्यास पुस्तिका वाटप कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मुदखेड (प्रतिनिधी): प्रकाश गवारे**

विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाविषयी उत्साह – पालकांनी शिक्षण उपक्रमाचे कौतुक

दिवसेंदिवस शैक्षणिक उन्नतीकडे वाटचाल करणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मेंडका (ता. मुदखेड, जि. नांदेड) येथे दिवाळी सुट्टीनिमित्त विद्यार्थ्यांना अभ्यासापासून दुरावू नये आणि सुट्ट्यांचा सदुपयोग व्हावा या हेतूने दिवाळी अभ्यास पुस्तिका वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमात इयत्ता १ ते ७ वीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शक अभ्यास साहित्याचे संच देण्यात आले.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या मुख्याध्यापिका पवार मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "दिवाळी हा सण आनंदाचा असला तरी शिक्षणाची गती खंडित होऊ देता कामा नये. या अभ्यास पुस्तिकांमुळे विद्यार्थी घरबसल्या अभ्यास करू शकतील तसेच सुट्टीनंतरच्या शैक्षणिक परीक्षांची तयारी देखील सुलभ होईल."

या वेळी पचलिंग सर, गाढे सर, भुरे मॅडम , पाटील सर, नवाडे मॅडम, बाचेवाड सर,लोकडे मॅडम शाळा व्यवस्थापन




समितीचे सदस्य व पालक प्रतिनिधी उपस्थित होते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुस्तिकेचे महत्त्व समजावून सांगत नियमित अभ्यासाचे मार्गदर्शन केले. "दररोज एक तास अभ्यास करा, दिवाळीनंतर नोटबुक तपासणी करण्यात येईल" असा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला.

शिक्षकवर्गाची पुढाकाराने योजना राबविली

दिवाळी अभ्यास पुस्तिका ही योजना शिक्षकवर्गाने स्वखर्चातून व काही ग्रामस्थांच्या सहकार्याने राबवली असल्याचे सांगण्यात आले. शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमाचे गावकऱ्यांनी व पालकांनी कौतुक केले.

कार्यक्रमाचे नियोजन खालीलप्रमाणे पार पडले:

विद्यार्थ्यांना अभ्यास साहित्याचे वाटप

भाषणांद्वारे प्रेरणा पर सल्ला

सुट्टीतील अभ्यासाचे नियोजन

आभार प्रदर्शन

पालकांकडून सकारात्मक प्रतिसाद

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाविषयी उत्साह निर्माण झाला असून "ही पुस्तिका मिळाल्याने मुलांचा अभ्यास सुट्टीतही सुरू राहील" असा प्रतिसाद पालकांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पचलिंग सर यांनी केले तर आभार प्रदर्शन खोडके सर यांनी मानले. शेवटी वाढत्या शैक्षणिक गुणवत्तेकडे लक्ष देण्याचा संकल्प करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# पालखेड जिल्हा परिषद आरक्षण सोडत आदिवासी समाजावर अन्यायकारक



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड**

(पिंपळगाव बसवंत) नाशिक जिल्हा निफाड तालुक्यातील आगामी होऊ घातलेल्या २०२५ च्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची आरक्षण सोडत नुकतीच पार पडलेली असून हि आरक्षण सोडत चुकीची व आदिवासी समाजावर अन्यायकारक असल्याने . नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद आरक्षण प्रक्रियेत निफाड तालुक्यातील पालखेड गट सर्वसाधारण केल्यामुळे आदिवासी समाजावर अन्याय झालेला आहे. १९९६ च्या नियमानुसार आरक्षण सोडत न करता चुकीच्या पद्धतीने आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.सर्वोच्च न्यायालयाने २५ सप्टेंबर रोजी दिलेले आदेशानुसार आरक्षण सोडतीची दुरुस्ती केलेली असून जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये १९९६ च्या नियमानुसार आरक्षण देणे आवश्यक आहे तसेच ते चक्रानुसार रोटेशन पद्धतीने केले जावे असे स्पष्ट केले आहे. परंतु पालखेड गट मध्ये सध्याचे सर्वसाधारण जागा हे या नियमाचे पालन करत नाही त्यामुळे पालखेड गटाचे विद्यमान आरक्षण रद्द करून १९९६ च्या नियमानुसार आणि रोटेशन पद्धतीने योग्य आरक्षण निश्चित करण्यात यावे याबाबतचे निवेदन. पालखेड ग्रामपंचायत तसेच आदिवासी शक्ती सेनेच्या वतीने नाशिक उपजिल्हाधिकारी मा. रोहित कुमार राजेंद्र सिंह राजपूत साहेब यांना देण्यात आले. या प्रसंगी आदिवासी शक्ती सेनेचे निफाड तालुका युवा अध्यक्ष श्री आकाश कराटे, एकनाथ गांगुर्डे, दिगंबर भोई, मनोज सासवडे, चेतन कोकाटे व आदित्य गांगुर्डे आदि उपस्थित होते .